

**Dr. Vaishali Chandrashekhar Pande**
Associate professor
Sanskrit Department
Smt Vatsalabai Naik Mahila mahavidyalaya, Pusad

| Sr. No. | Title of Research Paper | | Year Publication | National/ International | Page No. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | (लोकनायक) Loknayak Interdisciplinary Peer Reviewed Journal for innovative Research and Evaluation<br>ISSN (L) 2278-4284 | भारतीय ज्ञानपरंपरा आणि स्त्रीशिक्षण | January 2023 | International | 01–07 |
| 2 | International Journal of scientific Research in science and Technology<br>ISSN – 2395 – 6011 | भारतीय साहित्यात स्त्रियांचे योगदान | 28 Jan.2023 | International | 08–14 |
| 3 | प्राचीन भारतीय स्त्री जीवन<br>ISBN : 978-81-96291-2-6<br>प्रथमावृत्ती | साई ज्योती पब्लिकेशन विविध क्षेत्रात प्राचीन स्त्रियांचे योगदान | 8 मार्च 2023 | National | 15–25 |
| 4 | B.Aadhar<br>Single Bline Peer Reviewed & Refereed indexed Multidisciplinary International Research Journal<br>ISSN – 2278 – 9308 | साहित्य आणि समाज | April – 2023 | International | 26–30 |
| 5 | Galaxy Link<br>An International Multidisciplinary half yearly Research journal<br>ISSN – 2319 – 8508 | संस्कृत संगीत अनुबन्ध | Nov-April-2022-23 | International | 31–36 |
| 6 | Vidarbha International Interdisciplinary Research journal<br>ISSN 2319 – 4979 | लोकनायकांचे संस्कृत साहित्याच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान | June 2023 | International | 37–44 |
| 7 | B. Aadhar International peer reviewed Indexed Research journal<br>ISSN – 2278 – 9308 | संस्कृत साहित्यातील पर्यावरणविषयक विचार | Nov.– 2023 | International | 45–50 |
| 8 | The Rubrics journal of Interdisciplinary studies International Indexed and Peer reviewed journal<br>ISSN – 2454 – 1974 | श्रीमद् भगवद् गीतेतील संतुलित आहाराची संकल्पना | March – 2024 | International | 51–55 |

Special Issue : 1.2
January 2023
Vol. : IX

Interdisciplinary Peer Reviewed Journal For Innovative Research And Evaluation

# Loknayak

ISSN (L) 2278 - 4284



Indian Knowledge System : Concept, Scope and Criticism

## मराठी खंड ०१


| | | |
|---|---|---|
| 56 | भारतीय सांगीतिक ज्ञानपरंपरा व संत मीराबाईंचा भक्तिमार्ग<br>मिनल प्रभाकरराव राऊत | 331-336 |
| 57 | मीरालहरी खंडकाव्यातील अलंकारसौंदर्य<br>सौ. सुवर्णा संजयकुमार केवटे | 337-343 |
| 58 | संतांचे मूल्यविचार आणि आजचे जीवन<br>डॉ राजेश मिरगे | 344-347 |
| 59 | आधुनिक भारत आणि स्वामी विवेकानंद<br>प्रा. नरेश महाजन | 348-352 |
| 60 | कवी भास यांच्या संस्कृत नाट्यसृष्टीतील नाट्यपरंपरा व योगदान<br>कु. निर्मिती देवसमी<br>कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक | 353-363 |
| 61 | भारतीय ज्ञान परंपरा: स्वरूप, विकास व चिकित्सा 14 भारतीय ज्ञान परंपरा आणि वर्तमान शिक्षण पद्धती<br>नितिन पाटल | 364-372 |
| 62 | भारतीय ज्ञान परंपरा आणि ललित कला<br>DR. PRASHANT Z. BAGDE | 373-375 |
| 63 | भारतीय ज्ञान परंपरा आणि स्त्री शिक्षण<br>डॉ. ऋजुता बोरखेडे (राऊत) | 376-380 |
| 64 | भारतातील कुटुंब संस्थेचे बदलते स्वरूप संयुक्त कुटुंब आणि एक अपत्य असणारे कुटुंब तुलनात्मक अध्ययन<br>प्रा. कल्याणी सुधाकरराव वाणे | 381-385 |
| 65 | प्राचीन ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान व त्यांचा आधुनिक काळातील उपयोजनात्मक अभ्यास<br>श्री.संतोष मधुकरजी पवार | 386-390 |
| 66 | भारतीय ज्ञान परंपरा आणि विज्ञान तंत्रज्ञान यांचा सहसंबंधात्मक अध्ययन<br>कु.शितल पुर्वीराम राठोड | 391-396 |
| 67 | साहित्य आणि संगीतातून ज्ञान धारा<br>पुर्वा मधुकर | 397-400 |
| 68 | भारतीय ज्ञान परंपरेतील कुटुंब – पालनपोषण<br>कु. प्रणिता रमेशराव भुस | 401-405 |
| 69 | भारतीय संगीतातील घराणे परंपरेचा उगम व विकास<br>श्री. प्रभात मार्तंडराव मुर्तीनकर | 406-409 |
| 70 | भारतीय ज्ञान परंपरा आणि वाणिज्य व कृषी विकास<br>मिथीलेश गजानन लेंभे | 410-414 |
| 71 | संगीत कलेचे भारतीय ज्ञान परंपरेतील योगदान<br>प्रा. डॉ. प्रतिभा च. पचिकार | 415-418 |
| 72 | नाट्यशास्त्रातील प्रयोग परंपरा<br>राधा मुकुंद देशकर | 419-423 |

LOKNAYAK IPRJIRE ISSN (L) 2278-4284

# भारतीय ज्ञान परंपरा आणि स्त्री शिक्षण

डॉ. ऋजुता गोडबोले (पाटे)
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुणे
9923879743
rujutargodbole@gmail.com

**प्रस्तावना -**

'वर्तनातील अनुकूल परीवर्तन म्हणजे शिक्षण', अशी आजच्या संदर्भात शिक्षणाची व्याख्या करता येईल. जीवनात यशस्वी होण्याचे, आत्मविश्वास वृद्धिंगत करण्याचे अतिशय महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. आयुष्यातील सर्व समस्यांवर समर्थपणे मात करून सकारात्मक विचारांसह पुढे वाटचाल करण्याचे सामर्थ्य शिक्षण माणसाला प्रदान करते. कोणत्याही समाजाची सर्वांगीण प्रगती बऱ्याचशी शैक्षणिक प्रगतीवरच अवलंबून असते. स्त्री आणि पुरुष हे दोघेही समाजाचे सारखेच महत्त्वपूर्ण घटक आहेत. त्या दोन्ही घटकांना समान शिक्षणाची अत्यंत आवश्यकता असते. परंतु स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत मात्र देशपरत्वे, कालपरत्वे भिन्नता होती असे आढळते. म्हणून भारतीय परंपरेत स्त्री शिक्षणाची अवस्था नेमकी कशी होती. ह्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे. वेदांचा काळ उपनिषदांचा काळ, रामायण महाभारताचा काळ, स्मृतिकाळ ह्या कालपरंपरेत स्त्रीशिक्षणाची स्थिती कितपत प्रगत होती त्याची सोदाहरण चर्चा येथे केली आहे.

वर्तमानाच्या आरशात आपण नेहमी इतिहासाचा कानोसा घेत असतो म्हणून आपल्या 'वारशाची ही शिदोरी' त्यातील अनुकरणीय ते स्वीकारून आणि त्याज्य ते अव्हेरून पुढे जाणे हाच आपला श्रेष्ठ धर्म!'

**विषय विवरण:-**

स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्वाचे साधन म्हणजे स्त्रीशिक्षण होय. कोणत्याही समाजजीवनाच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मानदंड आहे. कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, त्यावरून ठरते.

**वैदिककाळ:-**

वैदिककाळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण दिले जात असे. स्त्रियांना उपनयनाचाही अधिकार होता. यज्ञ व धार्मिक कार्यांना जास्त महत्त्व असल्याने वैदिक शिक्षण हे मुख्य शिक्षण अशी कल्पना होती. उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनाला सुरुवात होत असे. त्यानंतर यज्ञ आणि वैदिक प्रार्थनांचे संपादन करण्याचा अधिकार त्यांना प्राप्त होत असे. ब्रह्मवादिनी आणि सद्योद्वाहा असे विद्यार्थिनींचे दोन प्रकार होते. ब्रह्मवादिनी ह्या ब्रह्मचर्य पाळून अध्ययन करीत असत. अध्ययन पूर्ण झाल्यावर त्या विवाह करीत किंवा

LOKNAYAK IPRJIIE ISSN (L) 2278-4284

त्यांच्या इच्छेनुसार त्या आजीवन ब्रह्मचर्य व्रताचे पालन करीत असत. वेदविद्येचा व ब्रह्मविद्येचा अभ्यास करीत, पठन आणि लेखनही करीत असत.

सद्योद्वाहा घरीच शिक्षण घेत असत. त्यांना शिकविण्यासाठी उपाध्याय असे लिहिणे, वाचणे, पाठांतर करणे या गोष्टींवर भर दिला जात असे. त्या मुली शिक्षणानंतर गृहस्थाश्रमात प्रवेश करीत असते. इच्छित शिक्षिकेच्या पेशा सुद्धा स्वीकारत असत. 'उपाध्याया' अशा संबोधनाने तिला संबोधले जात असे. जसे मन्त्रद्रष्टे ऋषी आहेत. तशा ऋषिकाही आहेत. ऋग्वेदात सत्तावीस स्त्रियांच्या मंत्रांचा समावेश आहे.

काव्य, संगीत, नृत्य, अभिनय अशा अनेक कलांबरोबर अस्त्र शस्त्र कौशल्ये स्त्रियांना शिकविली जात असत. खेल राजाची पत्नी विश्पला पतीसह युद्धात सहभागी झाली होती. वृत्रासुरासोबत त्याची माता दनु युद्धासाठी गेली होती. मुद्गलाची पत्नी इन्द्रसेना हिने पराक्रम गाजवून राक्षसांनी पळवून नेलेल्या गाई सोडवून आणल्या. दौत्यकर्मातही स्त्रिया प्रवीण होत्या. इन्द्राची दूती सरमा पणीकडे कुशल, चतुर दुती म्हणून गेली होती.

लोपामुद्रा विश्ववारा व घोषा या विदुषींनी रचलेल्या ऋचा ऋग्वेदात आढळतात.

ऋग्वेदात ज्या मन्त्रद्रष्ट्या स्त्रियांचा उल्लेख केला आहे त्यांची सूक्ते काव्यगुणांच्या दृष्टीने पुरुषांनी रचलेल्या सूक्तांपेक्षा कोठेही यत्किंचितही कमी नाहीत.

उपनिषद काळ:-

या काळात गार्गी, मैत्रेयी या विदुषी आदराने ओळखल्या जाऊ लागल्या. याज्ञवल्क्य पत्नी मैत्रेयी आत्मज्ञान विषयक जिज्ञासेबद्दल प्रसिद्ध होती. विदेहराज जनकाच्या राजसभेत जी आध्यात्मिक चर्चा चालत असे तिच्यात गार्गी प्रमुख होती. एका प्रसंगी तिने याज्ञवल्क्यालाही वादात कुंठित केले होते. सुलभा नावाची एक ब्रह्मवादिनी जनकाच्या दरबारात होती, ती ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आजन्म अविवाहित राहिली होती. आत्रेयी ही वाल्मिकी व अगस्त्य ऋषींकडे वेदान्त शिकणारी विदुषी होती.

गार्गीचा तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील अधिकार सर्वमान्य होता. त्यामुळे राजा जनकाने ब्रह्मयज्ञाच्या परिषदेला तिला सन्मानाचे आमंत्रण दिले होते. तिच्या मर्मग्राही प्रश्नांनी आणि विद्वत्तेने सर्व ऋषी दिपून गेले होते.

लोपामुद्रा ही तत्त्वज्ञ होती. आध्यात्मिक क्षेत्रातील तिची प्रगल्भता एवढी होती की सांसारिक वैभवाऐवजी आत्मिक ज्ञानाला तिने सर्वस्व मानले. तिनेही काही ऋचांची रचना केली. घोषा या विदुषीचेही लेखन उपलब्ध आहे. गार्गी आणि याज्ञवल्क्यपत्नी मैत्रेयी ह्या उपनिषदाच्या तत्त्वज्ञानावर चर्चा करीत गार्गी आणि याज्ञवल्क्य यांच्यातील प्रश्नोत्तरे गार्गीच्या विद्वत्तेची साक्ष देतात.

रामायणकाळ:-

\LOKNAYAK IPRJIRE ISSN (L) 2278-4284

**रामायणकाळात ब्रह्मवादिनींचे प्रमाण** हळूहळू कमी होऊ लागले. परंतु स्त्रीशिक्षणाची परंपरा मात्र अबाधित होती. विदेहराज जनकाच्या राजसभेत जी आध्यात्मिक चर्चा होत असे त्यात गार्गी प्रमुख होती. रामायणकाळात मुलींना प्रामुख्याने शारीरिक, मानसिक, व्यावहारिक व नैतिक असे चार प्रकारचे शिक्षण दिले जात असे.

शारीरिक शिक्षणाच्या अंतर्गत मुलींना धनुर्विद्या, युद्धाचे शिक्षण, सारथ्यकला, राजधर्मासंबंधी शिक्षण दिले जात असे. कैकेयीने युद्धात जखमी झालेल्या राजा दशरथाचे प्राणरक्षण केल्याचा उल्लेख वाल्मिकींच्या रामायणात आला आहे. (वा.रा. 2/11 $ 18 - 19) युद्धभूमीत जाऊन सारथ्य करणे, जखमींवर उपचार करणे ही कामेदेखील स्त्रिया समर्थपणे पार पाडत असत. त्या राजनितिनिपुण होत्या रामायणात कौशल्या, तारा यांना मंत्रविंदू असे म्हटले आहे. त्या युद्धशास्त्रात निपुण होत्या.

कैकेयीने रामाला वनवासात जाण्याची आज्ञा दिली तेव्हा चंद्रासोबत जशी रोहिणी तशी रामासह सीताही वल्कले परिधान करून निघाली तेव्हा गुरुवर्य वसिष्ठ सीतेला राज्याभिषेक करण्याचा पर्याय कैकेयीसमोर ठेवतात. रघुकुलाचे कुलपती असलेले ब्रह्मर्षी वसिष्ठ हा पर्याय उपस्थित करतात त्यावरून त्याची सत्यता आणि गांभीर्य लक्षात येते.

राम वनवासात जाण्यापूर्वी कौसल्येच्या महालात जेव्हा प्रवेश करतो तेव्हा कौसल्या मंत्रोच्चारण करून आहुती देत असल्याचा उल्लेख आहे. (वा.रा. 2/20/15)

पतीच्या विजयाची इच्छा करणाऱ्या तारेने वाली आणि सुग्रीवाच्या युद्धप्रसंगी मंत्रांची जाणकार असल्यामुळे स्वस्त्ययन केले. (वा.रा. 4/16/12)

महाभारतकाळ:-

कौरवांच्या दरबारात आपल्या बौद्धिक सामर्थ्याने पतींना दास्यत्वातून मुक्त करणाऱ्या द्रौपदीने भावाचे अध्ययन सुरू असताना स्वतःही त्यात भाग घेतला होता.

प्रिया च दर्शनीया च पण्डिता च पतिव्रता।

अथ कृष्णा धर्मराजमिदं वचनमब्रवीत्।। (महा.वन. 27/2)

या श्लोकात द्रौपदीला पंडिता, असे विशेषण लावलेले आहे. तसेच तिला धर्मज्ञा 'धर्मदर्शिनी' अशी विशेषणे देखील लावली आहे. (महा. 14/4/5) द्रौपदीने गृहशिक्षकाद्वारे बृहस्पति राजनीतीचे शिक्षण घेतले होते.

द्वैतवनात युधिष्ठिराबरोबर द्रौपदीची जी चर्चा झाली त्याचे अवलोकन केल्यास द्रौपदीच्या ज्ञानाची कल्पना येते. श्रीकृष्ण शिष्टाईचा प्रसंग असो, सत्यभामेसह झालेला वार्तालाप असो. या सा-यातून द्रौपदीच्या प्रगल्भेची जाणीव होते.

स्मृतिकाळ:-

स्मृतिकाळात स्त्रीशिक्षणाला काही प्रमाणात मर्यादा निर्माण झाल्या. स्त्रीशिक्षणाची परंपरा स्मृतिकाळात संपूर्णपणे खंडित झाली होती असे नाही. पण हा प्रवाह मात्र रोडावला. राजघराण्यातील, श्रेष्ठकुळातील स्त्रियांनाच प्राधान्याने शिक्षण प्राप्त होत असे. सामान्य स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे बंद होऊ लागले होते. याकाळात स्त्रियांचा दर्जा खालावत गेला. मनूने स्त्रीशिक्षणाला विरोध केला नाही. परंतु वेदाध्ययनाला मात्र त्याचा विरोध होता. स्त्रियांसाठी त्याने वेदाध्ययन वर्ज्य मानले.

आद्य शंकराचार्य आणि मंडनमिश्र यांच्यातील वादासाठी परीक्षक म्हणून मंडनमिश्रांची पत्नी भारतीदेवीची एकमताने निवड केली गेली होती. तिची विद्वत्ता आणि निःपक्षपातीपणा यांना हा मानाचा मुजरा होता.

लीलावती हा ग्रंथ भास्कराचार्यांनी आपल्या एकुलता एक मुलीच्या नावाने लिहिला. लग्नाचा मुहूर्त चुकला म्हणून तिला दुर्दैवाने अविवाहित राहावे लागले. तिला भास्कराचार्यांनी गणित शिकवले.

संस्कृत साहित्य प्रकारांमधील महाकाव्य नाटकादिंच्या नायिका ललित-कथा निपुण असल्याचे उल्लेख आढळतात. कालिदासाची शकुन्तला शीघ्रकवयित्री होती. मालविका आणि इरावती दोघीही शास्त्रीयनृत्यात अतिशय कुशल होत्या. शकुन्तलेच्या सख्या असलेल्या प्रियंवदा आणि अनसूया चित्रकलेत निपुण होत्या. भवभूतीची मालती देखील चित्रकलेत कुशल होती. ह्या सर्व उल्लेखांवरून गायन, वादन, नृत्य, चित्रकला अशा ललित कलांमध्ये मुलींना पारंगत करण्याकडे ह्या काळात विशेष कल दिसून येतो.

काव्यमीमांसाकार राजशेखर म्हणतो की, 'पुरुषांप्रमाणे स्त्रिया देखील काव्य करू शकतात. प्रतिभा ही लिंगभेदावर अवलंबून नसते.' राजशेखराला भेटलेल्या अनेक राजकन्या, प्रधानकन्या व गणिका शास्त्रपारंगत होत्या. नवव्या आणि दहाव्या शतकात अनेक कवयित्री होऊन गेल्या. काळाच्या ओघात त्यांचे काव्य लुप्त झाले तर काहींच्या काव्यरचनेचा समावेश नंतरच्या संस्कृत व प्राकृत कवींनी आपल्या ग्रंथात करून घेतला. यावरून स्त्रियांचे शिक्षण पूर्णपणे बंद झाले होते असे म्हणता येत नाही.

इ.स. 300 पर्यन्त बौद्ध व जैन धर्माचा स्त्रीशिक्षणासाठी मोठा हातभार लागला. बौद्ध आणि जैन धर्माने स्त्रियांना मठात प्रवेश दिला. संसाराचा त्याग करून् मोक्षमार्गाने जाणाऱ्या स्त्रियांची संख्या या दोन्ही धर्मांमध्ये अधिक होती. थेरी गाथेत अनेक लेखिकांचा उल्लेख आढळतो.

इ.स. पूर्व 300 नंतर मात्र स्त्रीशिक्षणाला उतरती कळा लागली मुगलांची आक्रमणे, ब्रिटिशांची आक्रमणे यासारख्या परकीय आक्रमणाच्या काळात स्त्रीशिक्षणाच्या प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते. बालवयात होणारे विवाह स्त्रीशिक्षणावर विपरीत परीणाम करणारे ठरले. स्त्रियांचे कार्यक्षेत्र केवळ घराच्या चार भिंतींपुरतेच मर्यादित बनले. मानसिक गुलामगिरीच्या विळख्यात अडकलेल्या स्त्रियांच्या मनात सुशिक्षित होण्याची जिज्ञासा उरली नाही. त्यांना या मानसिक गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करून त्यांना सक्षम बनविण्यास समर्थ पावले उचलली. आधुनिककाळात स्त्रीशिक्षणाचा हा प्रवाह पुन्हा जोमाने अखंडितपणे वाहू लागला आहे. शिक्षणाची दालने आता स्त्रियांसाठी सदैव खुली आहेत. स्त्रियांना आपल्या आवडीनुसार हवे ते क्षेत्र निवडण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य आज आहे. त्याचा उपयोग करून त्या यशोशिखरे पादाक्रान्त करीत आहेत.

भारतीय शिक्षण परंपरेकडे नजर टाकली असता विशेषत्वाने स्त्रीशिक्षणाच्या संदर्भात असे म्हणता येते की, कातळ फोडून उफाळणा-या झ-याप्रमाणे त्यांचे कर्तृत्व उजळून आले. संधी मिळताच त्या आकाशालाही गवसणी घालतील. हे खरेच आहे की, 'केला जरी पोत बळेचि खाले, ज्वाला तरी ते वरती उफाळे'

मुलींसाठी पहिली शाळा सुरू करणा-या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदान अविस्मरणीय आहे. मुलींच्या शाळांच्या पहिल्या भारतीय शिक्षिका आणि मुख्याध्यापिका, सर्व शैक्षणिक कार्य विनामूल्य करणा-या त्या पहिल्या अध्यापिका होत्या. आधुनिक स्त्रीशिक्षणाच्या अतिशय प्रगत अवस्थेचे सर्व श्रेय सावित्रीबाईंना जाते. या विवेचनाच्या निमित्ताने त्यांच्या थोर विभूतीस विनम्र अभिवादन !

सारांश -

भारतीय परंपरेत वेदकालापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक परिवर्तने झाली. प्राचीन काळात शिक्षण हे यज्ञसंस्थे भोवती गुंफलेले होते. बदलत्या काळानुसार शिक्षणाची व्याप्ती वाढत गेली. वाङ्मय, शास्त्र-शास्त्रविद्या संगीत नृत्यादि कला, सैनिकीशिक्षण असे स्त्रीशिक्षणाचे आयाम विस्तारित होत गेले.

मध्यंतरीच्या काळात हा प्रवाह थोडा रोडावल्या सारखा झाला. पण पूर्णपणे खंडित मात्र झाला नाही. आज भारतीय स्त्री शिक्षणात सातत्याने प्रगती करीत आहे. भारताचा इतिहास अनेक शूरवीर महिलांनी उज्ज्वल बनला आहे. सभ्य समाजाची निर्मिती त्या देशातील शिक्षित नागरिकांमुळे होते असे म्हटले जाते. पुरुषाला शिक्षित केल्याने मात्र संपूर्ण कुटुंब सुशिक्षित बनते देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी स्त्रीशिक्षण नितांत आवश्यक आहे.

संदर्भग्रंथ सूची


1) ऋग्वेद - ब्रह्मवर्चसम्, शांतिकुंज हरिद्वार, उत्तरप्रदेश १९९५ तृतीय आवृत्ती
2) प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती- अनंत सदाशिव आळेकर, मनोहर प्रकाशन, वाराणसी.
3) भारतातील थोर स्त्रिया - शं. वा. दांडेकर, दांडेकर प्रकाशन, पुणे.
4) मनु आणि स्त्री - डॉ. म. वा. कुलकर्णी, अ.भा. इतिहास संकलन समिती नाशिक: 2008
5) महाभारत- गीताप्रेस गोरखपूर.
6) रामायण - गीताप्रेस गोरखपूर
7) वेदकालीन स्त्रिया- डॉ. मधुकर आष्टीकर, सुरेश एजन्सी, पुणे
8) संस्कृत साहित्यातील स्त्री-विविध भूमिकांचे अध्ययन - डॉ.माधुरी निवृत्ती भास्करवार

Online ISSN : 2395-602X
Print ISSN : 2395-6011
www.ijsrst.com

IJSRST

Conference Proceedings

# National Multidisciplinary Conference on Emerging Trends, Opportunities and Challenges in Higher Education

Date : 28th January, 2023

Organized By
Janata Shikshan Prasarak Mandal's
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya Pusad,
Department of Home Science and IQAC
NAAC RE-ACCREDITED -B GRADE
affiliated to
Sant Gadge Baba Amravati University, Amravati, Maharashtra, India

VOLUME 10, ISSUE 7, JANUARY-FEBRUARY-2023

# INTERNATIONAL JOURNAL OF SCIENTIFIC RESEARCH IN SCIENCE AND TECHNOLOGY

PEER REVIEWED AND REFEREED INTERNATIONAL SCIENTIFIC RESEARCH JOURNAL

Scientific Journal Impact Factor : 8.014

Email : editor@ijsrst.com Website : http://ijsrst.com

Techno Science Academy

IJSRST

# National Multidisciplinary Conference on Emerging Trends, Opportunities and Challenges in Higher Education (VNMMV-2023)

28th January, 2023

Organised by

Janata Shikshan Prasarak Mandal's
Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidyalaya Pusad,
Department of Home Science and IQAC
NAAC RE-ACCREDITED - B GRADE

In Association with

International Journal of Scientific Research in Science and Technology
Print ISSN: 2395-6011 Online ISSN : 2395-602X
Volume 10, Issue 7, January-February-2023
International Peer Reviewed, Open Access Journal
Published By
Technoscience Academy

(The International Open Access Publisher)

website: www.technoscienceacademy.com

National Multidisciplinary Conference on Emerging Trends, Opportunities and Challenges in Higher Education
International Journal of Scientific Research in Science and Technology
Print ISSN: 2395-6011 | Online ISSN: 2395-602X (www.ijsrst.com)

# भारतीयसाहित्यात स्त्रियांचे योगदान 'रसरंग' ह्या डॉ. लीना रस्तोगी यांनी अनुवादित केलेल्या संस्कृतनाटयसंग्रहाचा परिचय

प्रा.डॉ.वैशाली पांडे
श्रीमती व.ना.महिला महाविद्यालय, पुसद

**सारांश —**
साहित्य ही समाजाची अभिव्यक्ती असते मानवीमूल्यांना परिपुष्ट करणारी साहित्यकृती ही नेहमीच सर्वार्थाने श्रेष्ठ ठरते, चिरंतन ठरते नानाविध प्रयोजने डोळ्यासमोर ठेऊन साहित्याचा निर्मितिव्यापार आणि आस्वादव्यापार अव्याहतपणे होत आहे.

संस्कृतसाहित्यात नाट्यक्षेत्र अतिशय समृद्ध आणि लोकप्रिय आहे. नाटक हे दृकश्राव्यमाध्यम असल्याने ते अधिक रंजक आहे. संस्कृतात साहित्यनिर्मिती जी परंपरा वेदकाळापासुन अव्याहतपणे पुढे चालत आली, त्यात स्त्रियांचा सहभाग सातत्यपूर्ण आणि महत्त्वपूर्ण आहे.

'रसरंग' ह्या नाटिकांच्या संग्रहात पाच संस्कृतानुवादित नाटिकांचा समावेश आहे. मुळात मराठी असलेली ही नाटके प्रायोगिक आहेत आणि संस्कृतातही त्याची प्रायोगिकता अबाधित आहे. विविध लेखकांनी मराठीत लिहिलेल्या या नाटिकांचा संस्कृतानुवाद डॉ. लीना रस्तोगी यांनी केला आहे. प्रस्तुत लेखात ह्या नाटिकांना परिचय करून दिला आहे. संस्कृतभाषा आधुनिक काळातही प्रायोगिक नाटकांचा विषय होऊ शकते. आधुनिक सामाजिक समस्यांवर तेवढ्याच समर्थपणे प्रकाश टाकू शकते हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना —**
नाटक या कलाप्रकाराला जीवनाचा आरसा असे संबोधले जाते. जीवनातील घटनांचे लोकरीतीने प्रतिबिंब ह्या आरशात आपल्याला दिसून येते. जनसमुदायाशी क्रिया प्रतिक्रिया करीत हा विषय विकसित होतो. दृक–श्राव्यकाव्य असे नाटकाचे स्वरूप असते. मानवी जीवनात मनोरंजन किंवा विरंगुळ्याचे साधन म्हणूनही नाटकाला महत्त्वाचे स्थान आहे. 'नाट्यं भिन्नरुचे: जनस्य बहुधाप्येक समाराधनम्।' असा दाखला प्रत्यक्ष महाकवि कालिदास देतात.

संस्कृतसाहित्यात 'नाटक' या वाङ्मयप्रकाराची परंपरा फार मोठी आहे. तिचा उगम वेदकाळापासून मानला जातो. महाकविकालिदास, भास, भवभूती, शूद्रक, विशाखदत्त इ. सारस्वतांनी ह्या परंपरेला अतिशय उन्नत अवस्थेत नेले. संस्कृत नाट्यलेखनाची ही परंपरा अर्वाचीन काळातही अनेक संस्कृत पंडितांनी अखंडितपणे समर्थपणे पुढे वाहून आणली हा निर्मितीप्रवाह अक्षुण्ण राखला हे निर्विवाद आहे. परंतु छोट्या प्रायोगिक संस्कृतनाटिकांची निर्मिती मात्र फार मोठ्या प्रमाणात झाल्याचे आढळत नाही. अर्थात अशा लघुनाटिकांची निर्मिती झाली आणि होत आहे. परंतु तुलनात्मक दृष्टया तिचा प्रवाह लघु असल्याचे जाणवते. या पार्श्वभूमीवर डॉ. लीना रस्तोगी ह्यांनी अनुवादित केलेल्या आशय संपन्न अशा ह्या संस्कृतनाटिका निश्चितच आस्वाद्य ठरतात, मार्गदर्शकही ठरतात. त्यातून त्या प्रयोगक्षम असून मूळ मराठी भाषेइतकाच त्यांचा अनुवादही अतिशय सरस व तितकाच परिणामकारक आहे.

प्रसिद्धी, यश, कीर्ती, मानसन्मान, धनप्राप्ती, मतप्रचार, सामाजिक सुधारणा, दुष्टलोकांचा नाश, हितोपदेश, राष्ट्रभक्ती, देशभक्ती अशी निरनिराळी प्रयोजने समोर ठेवून प्राचीन काळापासून आजतागायत साहित्यनिर्मिती होत आली आहे. विशिष्ट काळ आणि परिस्थितीला अनुलक्षुन ते ते प्रयोजन नाटकाच्या बाबतत त्या त्या काळी

Copyright: © the author(s), publisher and licensee Technoscience Academy. This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution Non-Commercial License, which permits unrestricted non-commercial use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited

Volume 10, Issue 7, January-February-2023 : 167-171

प्रभावी ठरत असते. साहित्यामध्ये जीवनाचे चित्रण करून समाजजीवनाला गती देण्याचे एक अद्भुत सामर्थ्य असते. कलावंत हा समाजाचाच एक भाग असतो. समाजाच्या अंतरंगातील संघर्ष चित्रित करणे हे त्याचे आद्य कर्तव्य असते.

**लेखिकेचा परिचय :–**

डॉ. लीना रस्तोगी ह्या महाराष्ट्रातील प्रख्यात विदुषी संस्कृतभाषेसह इतरही अनेक भाषांवर असामान्य प्रभुत्व प्राप्त केलेल्या लेखिका, प्रतिभासंपन्न कवयित्री, ज्येष्ठ रंगकर्मी, उत्तम वक्त्या आहेत.

संस्कृत, पाली, प्राकृत, मराठी ह्या विषयात सुवर्णपदकासह त्यांनी वाङ्मय पारङ्गत पदवी प्राप्त केली आहे. राष्ट्रभाषाप्रवीण परीक्षेत सर्वप्रथम, संगीतशिक्षापरिषदेची काव्यमध्यमा परीक्षा उत्तीर्ण, तसेच मराठी भाषेत साहित्य विशारद ही पदवी त्यांनी प्राप्त केली.

रस्तोगी महोदया १९७२ ते १९८६ ह्या कालावधीत आदर्श महाविद्यालय उमरेड येथे संस्कृतविभागात व्याख्याता म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर १९८६ ते १९९९ ह्या कालावधीत त्या संस्कृतप्रपाठक म्हणून कार्यरत होत्या.

डॉ. लीना रस्तोगी ह्यांचे संस्कृत, मराठी, हिंदी ह्या तीनही भाषांमधील विपुल साहित्य प्रकाशित झाले आहे. येथे केवळ संस्कृताशी संबंधित ग्रंथांचा नामोल्लेख करीत आहे. रससंग – हा संस्कृतानुवादित एकांकिकांचा संग्रह, स्वयंसिद्ध प्रज्ञाचक्षुः हा संस्कृत ग्रंथ हे दोन्ही ग्रंथ संस्कृतभारती नवीदिल्ली द्वारा प्रकाशित झाले आहेत. 'सांख्यतत्त्वदीपिका' नामक दर्शनशास्त्रावरील ग्रंथ नागपूर येथील मंगेश प्रकाशन द्वारा प्रकाशित झाले आहे.

'मला उमगलेला राम' हा त्यांचा रामायणाची अतिशय सुजाण–सुव्यवस्थित चिकित्सा करणारा ग्रंथ, संस्कृतभाषा प्रचारिणीसभेद्वारा प्रकाशित झाला आहे.

श्रीमद्भगवद्गीता आणि स्वामी विवेकानंद हा श्रीमद्भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान आणि स्वामी विवेकानंदांची आदर्शजीवनशैली यांची सांगड उलगडून दाखविणारा ग्रंथ पुण्याच्या विवेकानंद केंद्राने प्रकाशित केला आहे. त्यांचे अनेक अनुवादही प्रकाशित झाले आहेत. कौंडिन्यस्मृति ह्या डॉ.पी.सी. रामचन्द्रुडुलिखित संस्कृतग्रंथाचा त्यांनी केलेला मराठी अनुवाद संस्कृतभाषा प्रचारिणी सभेद्वारा प्रकाशित झाला आहे.

लेखिकेचे संस्कृत, मराठीत संपादित ग्रंथही अनेक आहेत. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने त्यांचे 'बालसाहित्यम्' चे तेवीस चरित्रात्मक संपादित खंड प्रकाशित केले आहेत. विस्तारभयास्तव संपूर्ण साहित्य संपदेचे वर्णन प्रस्तुत लेखात केले नाही.

प्राप्तसन्मान – डॉ. लीना रस्तोगी ह्यांना अनेक बहुमोल असे सन्मान प्राप्त झाले आहेत. १९९९ साली महाराष्ट्र शासनद्वारा संस्कृत पंडिता पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. २०१२ साली बाबासाहेब घटाटे जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात २०१३–१४ ह्या दोन्ही वर्षी सलग महाराष्ट्रराज्य संस्कृतनाट्यलेखन स्पर्धेचा प्रथम पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. २०१७ मध्ये संस्कृत पंडिता ह्या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. २०१८ मध्ये त्यांना 'ज्ञानयोगी' हा बहुमानदायक सन्मान प्राप्त झाला. २०१९ मध्ये महाकविकालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. त्या शिवाय मराठी, हिंदी काव्यलेखनासाठी अनेक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

प्रस्तुत लेखात डॉ. लीना रस्तोगी त्यांच्या समृद्ध साहित्य-संपदेतील रसरंग ह्या संस्कृतानुवादित एकांकिकेच्या संग्रहाची चर्चा केली आहे. त्या मागचे प्रमुख कारण म्हणजे ह्यातील अनुवादाचे सौंदर्य अनुभवण्यासारखे आहे, ते रसिकांसमोर यावे, या नाटिकांच्या परिचयाने आधुनिककाळातही, आधुनिक विषयांचे

Volume 10, Issue 7, January-February-2023 : 167-171

प्रतिपादन करताना संस्कृतभाषा अत्यंत सोप्या, सरल, प्रवाहीपद्धतीने वापरली जाऊ शकते हे सिद्ध करणे या प्रमुख उद्देशाने हा लेखनप्रपंच!

संस्कृतानुवाद हे कौशल्याचे काम आहे. अनुवादात एका भाषेतला मजकूर दुसऱ्या भाषेत, त्या शब्दातील वाक्यातील आणि लिखाणातील भाव, विचार आणि दृष्टिकोन त्यांच्यासह अनुवादामध्ये नेमकेपणाने व्यक्त करावा लागतो. अनुवादाचा अर्थ भाषांतर असा नाही. मूळ लिखाणाचा भावार्थही सांभाळावा लागतो. त्यातला मथितार्थ समजाऊन घेऊन सौंदर्यस्थळे जाणून घेऊन ती अनुवादात उतरविणे तितकेच गरजेचे असते. 'रसरङ्ग' ह्या डॉ. लीना रस्तोगी यांच्या द्वारा अनुवादित संस्कृत नाट्यसंग्रहात ही अनुवादप्रक्रिया त्यांना अतिशय उत्तम रीतीने साधली आहे. स्रोतभाषा आणि लक्ष्यभाषा या दोन्हीवरही त्यांचे प्रभुत्व आहे. सृजनशीलता आणि संवेदनशीलता ह्या दोन्ही जाणीवा लेखिकेच्या ठिकाणी अतिशय प्रखर असल्याने अनुवादाचा हा कलाविष्कार, त्याचे शास्त्र आणि तंत्र त्यांना उत्तमरीतीने साधले आहे.

कुठल्याही सजीव वस्तूच्या आयुष्यक्रमात निसर्गक्रमाने होणाऱ्या घडामोडी भाषेच्या जीवनातही होत असतात. भाषा ही परिवर्तनशील आणि नश्वर असली तरी तिच्यात निर्माण झालेले साहित्य स्थिर आणि अमर असू शकते. म्हणून भाषेला जपण्याचा अट्टाहास केला नाही तरी साहित्याचे जतन करण्याची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे. कलेचा एक आविष्कार म्हणून साहित्य हा मानवाच्या संस्कृतीचा एक अमोलिक भाग आहे. त्याचे जतन आपले सांस्कृतिक कलाधिष्ठित कर्तव्य ठरते' असे डॉ.गो.के. भट 'नाट्यसृष्टी' नामक आपल्या ग्रंथात विवेचन करतात. ते अतिशय सार्थ आहे. भिन्न भिन्न रूची असलेल्या प्रेक्षकांना विविध प्रकारांनी रिझवणारी एकमात्र कला म्हणजे नाट्य" असे महाकवी कालिदासाने म्हटले आहे. नाट्य एखादयाला आनंद देईल. एखादयाचे मनोरंजन करील, कुणाला धीर, दिलासा देईल तर कुणाला हितोपदेश करील!

काळाच्या ओघात संस्कृत किंवा संस्कृतानुवादित नाट्यकृतींच्या नवनिर्मितीचा ओघ काहीसा मंदावला असला तरी त्याचे सातत्य मात्र कायम आहे. विस्तारभयास्तव आधुनिक संस्कृत नाटकांचा नामोल्लेख प्रस्तुत लेखात केला नाही. राष्ट्रीयसंस्कृतसंस्थान नवी दिल्ली द्वारा प्रकाशित यादीमध्ये १६८० पेक्षाही अधिक साहित्यकृतींचा उल्लेख आला आहे. हंसरक्षणम्, वृक्षरक्षणम् ही पुरस्कृत संस्कृत नाटके त्यातीलच आहेत. ह्याच परंपरेतील एक नाट्यसंग्रह म्हणजे रसरङ्ग प्रस्तुत लेखात लेखिकेचा व नाटकांचा परिचय करून दिला आहे व नाटकांच्या विषयानुसार त्यांची प्रयोजने स्पष्ट केली आहेत. तसेच प्रयोगिक नाटके म्हणून त्यांची परिणामकारकता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. संस्कृतभाषेचा प्रचार, प्रसार होण्यासाठी ही भाषा संवादाचे सहज सोपे माध्यम आहे हे समाजासमोर प्रदर्शित करण्याचे ही नाटके म्हणजे अतिशय परिणामकारक प्रभावी माध्यम कसे ठरले आहेत त्याचे प्रतिपादन प्रस्तुत लेखात केले आहे.

**विषयविवरण —**

**'रसरङ्ग'** हा पाच संस्कृत एकांकिकांचा संग्रह आहे. ह्या पाचही नाटिका संस्कृतानुवादित आहेत. त्यांचे विविध ठिकाणी यशस्वी प्रयोग झाले आहेत. महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्यस्पर्धा, अखिलभारतीय नाट्यमहोत्सव या सारख्या प्रसंगी त्यांचे प्रयोग होऊन पारितोषिके देखील प्राप्त झाली आहेत.

सरस्वती सेवा योजना — ६८ च्या अंतर्गत संस्कृत भारती नवदेहली द्वारा ह्या ग्रंथाचे प्रकाशन २००३ मध्ये करण्यात आले.

**१) मोहवनम् —**

'मोहाचे वन' ह्या सौ. सुधा पांढरे लिखित मराठी नाटिकेचा हा संस्कृतानुवाद आहे. अतिशय संवेदनशील असा सामाजिक विषय ह्या नाटकात कौशल्याने हाताळला आहे. क्षणिक मोहाच्या आहारी गेल्याने आयुष्य कसे उध्वस्त

Volume 10, Issue 7, January-February-2023 : 167-171

होऊ शकते याचा इशारा हे कथानक देते. मुलींचे वसतीगृह त्यातील वातावरण ह्याचे परिणामकारक चित्रण ह्या नाटिकेत आले आहे. प्रत्येक पात्राचे संवाद अतिशय समर्पक त्यांच्या भूमिकेनुसार साजेसे आहेत. द्वारपाल किंवा सखुबाईच्या संवादातील खटकेबाजपणा, निरीक्षिकेची शिस्त, विद्यार्थिनींचा खट्याळपणा ह्या सगळया भावना संस्कृतातही तेवढयाच जिवंतपणे उतरल्या आहेत. नाटकाचे कथानक सुरुवातीपासुन शेवटपर्यन्त प्रेक्षकांना तितक्याच ताकदीने आकर्षित करते. कुठेही त्याची पकड सैलावत नाही. शेवटी आलेले भरतवाक्य तर अतिशय उल्लेखनीय आहे–

नव्या योषा विदधतु पदं सत्पथे छात्रबाला:
संस्कारै: स्वै: कुलजनकृतै: राजमाना भवन्तु।
पाश्चात्यैस्तैर्यदपि बहुशो हानिमापद्यमाना
सर्वैर्मान्या त्रिभुन जये रोचतां संस्कृतिर्न:॥

प्रत्येक तरूणी सन्मार्गाने जावी। आपले संस्कार तिने प्राणपणाने जपावे. आपली संस्कृती त्रिभुवन विजयी व्हावी. एतदर्श शुभेच्छा ह्या भरतवाक्यात व्यक्त झाल्या आहेत.

ह्या नाटिकेचे मंचन २००८ मध्ये प्राच्यविद्यापरिषदेत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारा नागपूर येथे वसंतराव देशपांडे सभागृहात झाले.

महाराष्ट्र राज्य संस्कृत नाटयस्पर्धेत २००८ साली ह्या नाटिकेचा प्रयोग सावित्रीबाई फुले सभागृह, डोंबिवली येथे झाला. ह्या वेळी नाट्यप्रयोगाला द्वितीय क्रमांक, दिग्दर्शनास द्वितीय क्रमांक पात्रांच्या अभिनयास रौप्यपद आणि अभिनय प्रमाणपत्र प्राप्त झाले. राष्ट्रीय संस्थान सागर द्वारा आयोजित अखिलभारतीय नाट्यमहोत्सवात २०१० साली ह्या नाटिकेचा प्रयोग झाला.

**२) बण्डु: अभिनय करोति –**

मूळ नाटक गंगाधर गाडगीळ लिखित बंडु नाटक करतो! गंगाधर गाडगीळ सुप्रसिद्ध मराठी लेखक आहेत. त्यांच्या ललित वाङ्मयात अशा अनेक लघुनाटिकांचा समावेश आहे. विनोदी बाज असलेल्या त्या डॉ. लीना रस्तोगी द्वारा अनुवादित नाटिकेची निर्मिती संस्कृतभाषा प्रचारिणी सभेने केली व तिला प्रथम पुरस्कार निर्मिती व दिग्दर्शनासाठी प्राप्त झाला.

**३) विकसतु एषा कलिका –**

श्री गजानन पांडे लिखित मूळ मराठी नाटिकेचा लेखिकेने संस्कृतानुवाद केला आहे. अतिशय संवेदनशील अशा सामाजिक समस्येवर प्रकाश टाकणारे हे नाटक मानसशास्त्राशी संबंधित आहे. विषयाची तीच संवेदनशीलता लेखिकेने अतिशय समर्थपणे संस्कृतानुवादात अबाधित ठेवली आहे. संस्कृतभाषा प्रचारिणी सभेद्वारा निर्मित श्री गजानन पांडे द्वारा दिग्दर्शित ह्या नाटिकेचे प्रयोग एल.ए.डी. महाविद्यालय, नागपूर तसेच २०१० मध्ये त्रिपुरा मधील अगरतला येथे झालेल्या राष्ट्रीय संस्कृतसंस्थानमुळे त्या अखिल भारतीय नाटयमहोत्सवात नाटिकेचा प्रयोग झाला. कालिदास पर्व प्रसंगी सायंटिफिक सभागृह, नागपूर येथेही हे नाटक सादर झाले.

**४) गृहहीन:**

वृद्धांची घरात होणारी अवहेलना ही फार मोठी समस्या अनेक कुटुंबात अस्तित्वात असते. त्यावर प्रकाश टाकणारे सौ. प्रतिभा कुलकर्णी यांचे मूळ मराठी भाषेतील बेघर नावाचे नाटक आहे. त्याचा डॉ. लीना रस्तोगी यांनी केलेला सहज–सुंदर संस्कृतानुवाद म्हणजे गृहहीं! ह्या समस्येकडे बघण्याचा वेगळा सकारात्मक दृष्टिकोन हे नाटक देते.

Volume 10, Issue 7, January-February-2023 : 167-171

महाराष्ट्रराज्य नाट्यस्पर्धा, नागपूर, अमरावती आणि अखिल भारतीय नाट्यस्पर्धा गांधिनगर, गुजरात येथे ह्या नाटिकेचे मंचनच झाले.

**५) नरकवास एववरम्। –**

या नाट्यसंहितेची मूळरचना अॅड अजय धारे यांची आहे. संस्कृतानुवाद डॉ. लीना रस्तोगी यांनी अतिशय सुयोग्य पद्धतीने केला आहे. विनोदाच्या माध्यमातून समाजातील व्यंगांवर परखड टिका करणारी, हसत हसत डोळयात अंजन घालणारी ही नाटिका प्रेक्षकांना अतिशय प्रभावित करणारी आहे.

नाटकाचे भरतवाक्य अतिशय सार्थ आहे. ते दीर्घ असून त्यातून 'हे ईश्वरा हे विश्व मंगल बनविण्यासाठी सत्वर अवतीर्ण हो।' असा भावार्थ त्यातून प्रकट होतो. शेवटी 'यदा यदा ही धर्मस्य.....' ह्या भगवान श्रीकृष्णांच्या आश्वासक अभिवचनाची आकाशवाणी होऊन ही नाटिका संपते.

नागपूर येथे झालेल्या राज्य नाट्यस्पर्धेत ह्या नाटिकेचा यशस्वी प्रयोग झाला.

**निष्कर्ष: –**

संस्कृतभाषा मानवसभ्यतेच्या इतिहासाशी निगडित असलेली विश्वातील अशी प्राचीन भाषा आहे की जी आधुनिक काळातही पूर्णपणे सार्थ आहे.

संस्कृतभाषा अधिक लोकप्रिय व्हावी, इतर जीवनावश्यक भाषांप्रमाणेच संस्कृतभाषेचे ही स्थान निर्माण व्हावे एतदर्थ चालू असणाऱ्या सर्व द्रष्टया लोकांनी केलेल्या प्रयत्नांमधील हा अनुवादित संस्कृतनाट्यप्रयोग लेखन अतिशय डोळसपणे केलेला प्रयत्न आहे. भारतीय संस्कृती आणि भारताचे भावनिक ऐक्य जिवंत राखण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य संस्कृतभाषा करते. ज्ञानभाषा असणारी संस्कृतभाषा 'बोलीभाषेत' परिवर्तित करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य लेखिकने या अनुवादांचा निमित्ताने केले आहे.

संस्कृतवाङ्मय म्हणजे केवल धार्मिक किंवा कर्मकांडात्मक साहित्य नसून मानवी जीवनाच्या सर्व विषयांना ती सहज स्पर्श करते हे रसरङ्गाच्या निमित्ताने लेखिका स्पष्ट करतात. संस्कृतभाषा ही सहज आदान–प्रदानाची भाषा आहे. हे हया एकांकिका वाचतांच लक्षात येते. देववाणीचा ध्वज अनुवादाच्या क्षेत्रात लीलया फडकविणाऱ्या प्रतिभेला ह्या लेखाच्या निमित्ताने विनम्र अभिवादन!

**संदर्भ ग्रंथ सूची –**


१) रसरंग – डॉ. लीना रस्तोगी – संस्कृतभारती, नवी दिल्ली

२) भारतीय नाट्यपरंपरा – नेमीचंद जैन

३) भरतमुनी प्रणित नाट्यशास्त्र – प्रो. ब्रिजमोहन चतुर्वेदी चौखम्बा प्रकाशन, पटना

४) नाट्यशास्त्र का इतिहास – डॉ. पारसनाथ द्विवेदी चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी

५) भारतीय संस्कृतिकोश – पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे

६) https://mr.m.wikipedia.wiki

७) नाट्यसृष्टी – डॉ.गो.के.भट कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुण

SAI JYOTI

# प्राचीन भारतीय स्त्री जीवन

प्रा. डॉ. अपर्णा अभय पाटील







SAI-JYOTI PUBLICATION
*The way of Light*
Nagpur | Pune | Delhi

- प्राचीन भारतीय स्त्री जीवन
- © प्रा.डॉ. अपर्णा अभय पाटील

- प्रथम आवृत्ती : ०८ मार्च २०२३
- ISBN : 978-81-96291-2-6
- प्रकाशन व मुद्रक
  **श्रीमती ज्योती नरेश खापेकर**
  **साई ज्योती पब्लिकेशन**
  तिन-नल चौक, कसारपुरा,
  इतवारी, नागपूर - ४४० ००२
  **मो.नं. (+९१) ९७६४६७३५०३**
  ई-मेल : sjp10ng@gmail.com
  website : www.saijyoti.in

**मुद्रण आणि वितरण**
**श्री. गणेश नारायणराव राऊत**
**ओम साई पब्लिशर्स अँण्ड डिस्ट्रिब्युटर्स**
२९, इंदिरानगर टी.बी.वॉर्डच्या मागे,
नागपूर - ४४० ००३,
**मो.नं. ९९२३६९३५०६**
ई-मेल-rautg1980@gmail.com

- विक्री कार्यालय
  **बुक्स अँण्ड बुक्स**
  ६५, शॉप नं. २, राधिका पॅलेस,
  हनुमान नगर रोड, मेडिकल चौक, नागपूर.

**शाखा**

**पुणे - २०३, परिस स्पर्श हाईट,**
अंबामाता मंदीर रोड,
अंबाबाई दरा, धायरी
पुणे-४११०४१,
**मो.नं.:९४२०३१८८८४**

**न्यू दिल्ली -२१३, वर्धन हाऊस,**
७/१२ अंसारी रोड, दरियागंज
न्यू दिल्ली - ११०००२
**मो. ८८८८८२८०२६**
**९३२५६५६६०२**

- अक्षर रचना:
  **लक्ष्मी ग्राफिक्स**, मनिष नगर,
  नागपूर-५, मो.नं. ७३८५०४२२४८

# प्राचीन भारतीय स्त्री जीवन

प्रा. डॉ. अपर्णा अभय पाटील

साई ज्योती पब्लिकेशन

## अनुक्रमणिका...


| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | पेज नं. |
|---|---|---|---|
| १. | प्राचीन भारतीय स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन | प्रा. डॉ. निलय देशमुख | ५—१० |
| २. | स्त्रियांच्या सामाजिक दर्जातील बदल | डॉ. संतोष विष्णू चतुर | ११—१६ |
| ३. | रामायणकालीन स्त्रियांचे जीवन | गीता भाऊराव गावंडे | १७—२४ |
| ४. | पण्यस्त्रियांविषयी उल्लेख व तरतुदी | डॉ. जयश्री अ. सकळकळे | २५—३३ |
| ५. | प्राचीन भारतीय स्त्री ची सामाजिक स्थिती | प्रा. निलेश गायकवाड | ३४—३८ |
| ६. | 'आद्य कवयित्री महदंबा:व्यक्तिमत्व आणि वाड्मय दर्शन' | प्रा. निलेश गायकवाड | ३९—४४ |
| ७. | थेरीगाथा : प्राचीन काळातील स्त्रीमुक्तीच्या परिघाचे दिग्दर्शन करणाऱ्या गाथेतील कल्याणमित्र धर्माचा बोध | प्रा. प्रीतम वसंतराव गावंडे | ४५—५१ |
| ८. | जैन व बौद्ध धर्मांमधील श्रावणी व भिख्खुणी | डॉ. अशोक राणा | ५२—६७ |
| ९. | प्राचीन भारतीय स्त्री— जीवन : एक आकलन | प्रा. डॉ. अपर्णा अ. पाटील | ६८—७२ |
| १०. | स्त्रियांची विविध रूपे: कुलटा व गणिका | डॉ. अशोक राणा | ७३—८१ |
| ११. | प्राचीन भारतीय स्त्रियांचे शैक्षणिक जीवन | डॉ. व्ही. एस. पचगाडे<br>डॉ. ए.जी. वाकोडे | ८२—८६ |
| १२. | विविध क्षेत्रात प्राचीन स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ. वैशाली पांडे | ~~६७~~ ८९—९२ |

# मनोगत

''प्राचीन भारतीय स्त्री–जीवन एक आकलन'' हा संपादीत ग्रंथ तयार करून,सर्व मान्यवरांचे शोध निबंध एकत्रीत करून आपणा समोर सादर करतांना,मला अत्यंत आनंद होत आहे. सर्वच मान्यवरांनी अतिशय अभ्यासपूर्वक लेख या संपादित ग्रंथात लिहिलेले आहेत.

डि.व्ही.एस.पी मंडळा व्दारा संचालीत बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय, दिग्रस तसे ग्रामीण भागात कार्यरत असणारे महाविद्यालय आहे: उच्च शिक्षणा बरोबरच अनेक शैक्षणिक, सामाजिक पातळीवर विविध समाजपयोगी कार्यक्रमांचे आयोजन आमचे महाविद्यालय करीत असते. तसेच संशोधनाच्या क्षेत्रात राष्ट्रीय, आतंरराष्ट्रीय स्तरावरही हे महाविद्यालय सक्रीय असते. कोरोना काळात ही अनेक चर्चासत्रांचे आयोजन आम्ही केले. नुकत्याच येवुन गेलेल्या ''नॅक'' टीमने आमच्या महाविद्यालयाला ''।'' ग्रेड ;ब्ळच।.३.१६द्ध दिलेला आहे. भव्य वास्तु, विस्तीर्ण क्रिडांगण, समृध्द, वाचनालय, सर्व विषयाचे स्वतंत्र बिभाग, आपल्या कर्तव्याप्रती जागृत आणि समर्पीत प्राध्यापक वृंद आणि प्राचार्य या मध्ये आमच्या डि.व्ही.एस.पी मंडळाचे योगदान आणि भरपूर पाठींबा नेहमीच असतो. संस्थेचे अध्यक्ष मा.विजय कुमारजी बंग, आणि सचिव द्वय डॉ.अभय पाटील आणि श्री.शामभाउ पाटील यांनी आम्हाला नविण्यपूर्ण उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात भारतीय संस्कश्तीचा विसर पडतो की काय की ती फक्त उपचारा पुरतीच राहीली? असा प्रश्न पडतो. त्यासाठी ''प्राचीन स्त्री जीवन'' यात डोकावणे महत्वाचे वाटते आजच्या पेक्षाही प्राचीन काळातील स्त्री ही जास्त विज्ञान निष्ठ, तर्कशुध्द विचार करणारी होती असे म्हणावेसे वाटते. त्यासाठी हा प्रपंच प्राचीन काळापासून भारतीय स्त्रीची वाटचाल राजकीय,सामाजिक, आर्थिक, सांस्कशतिक आणि कौटुंबिक पातळीवर कशी होत राहीली याचे अभ्यासपूर्ण विवेचन आपल्याला या संपादीत ग्रंथात सापडेल अशी अपेक्षा करू या. काळ बदलला तसे संदर्भ ही बदलतात म्हणून जरा थांबून मागे वळून पहाणे आवश्यक आहे.

या ग्रंथाच्या निर्मितीसाठी आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर तर कर्मचारी यांनी आम्हाला खूप मदत केली.तसेच महाविद्यालयाचे माजी प्राचार्य कॅप्टन व्ही.एल. खळतकर सर आजचे प्राचार्य डॉ.अरविंद लाडोळे सर यांचे प्रोत्साहन फार महत्वाचे. आणि आमचे मराठी विभाग प्रमूख डॉ.रूपेश कऱ्हाडे सर !

ज्यांच्या सहकार्याशिवाय हा ग्रंथ पूर्ण होउु शकला नसता ते आमचे सहकारी डॉ. मनोज भगत सर! तसेच साईज्योती प्रकाशन — नागपूर चे मा. श्री गणेश राउुत साहेब आणि त्यांचे सहकारी, ह्या सर्वांना याचे श्रेय. म्हणूनच हा ग्रंथ वाचकाच्या स्वाधीन करताना मला मनस्वी आनंद होत आहे

संपादक
प्रा. डॉ. अपर्णा अभय पाटील
बा. बु. कला, ना. भ. वाणिज्य
बा. पा. विज्ञान महा—दिग्रस
जि : यवतमाळ
मो. न. ९७३०७७५५८५

# विविध क्षेत्रात प्राचीन स्त्रियांचे योगदान

**प्रा.डॉ.वैशाली पांडे**
श्रीमती.व.ना.महिला महाविद्यालय, पुसद
९९२३८७९७४३
rujutargodbole@gmail.com

**सारांश**

प्राचीन भारतीय समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अत्यंत निकोप आणि उदार होता. 'स्त्री' म्हणून तिला कनिष्ठ दर्जा देण्याची प्रवृत्ती वेद, उपनिषद काळामध्ये निर्माण झालेली नव्हती. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता' ही भावना मनाशी जोपासून तत्कालीन समाज स्त्रियांना काकणभर अधिक आदराची वाणगूक देत होता. तत्कालीन स्त्री–सौजन्याची भावना निश्चितच अनुकरणीय आहे. स्त्रिया देखील स्वत:च्या कर्तव्यपूर्तीस तत्पर होत्या. पतीच्या बरोबरीने कार्य करीत होत्या. त्याच्या हितासाठी झटत होत्या. प्रसंगी युद्धभूमीवर जाऊन युद्धही करीत होत्या. स्त्री म्हणून किंवा अबला म्हणून कोणतीही दुबळेपणाची भावना त्यांनी अंगीकारलेली नव्हती. ज्याप्रमाणे निखाऱ्यावर राख जमली की फुंकर घालून ते स्फुल्लिंग चेतवावे लागते. प्रज्वलित करावे लागते तसेच आपला हा तेजस्वी वारसाही स्वाभिमानाची फुंकर घालून तेजाळणे आणि त्याच्या प्रकाशात वाटचाल करणे अत्यंत गरजेचे वाटते.

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन संस्कृती असून तिने प्रदान केलेली जीवनमूल्ये चिरंतन मार्गदर्शक व प्रेरक आहेत. ह्या महान संस्कृतीच्या निर्मितिप्रक्रियेत संवर्धन आणि संगोपनाच्या प्रक्रियेत प्राचीन भारतीय स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. किंबहुना त्यांच्या सहभागाविना ही विकासप्रक्रिया परिपूर्ण होणे आणि प्रवाहित राहणे अशक्यप्रायच आहे. स्त्री ही समाजाच्या विकासाचा मानदंड मानली जाते. प्राचीन भारतीय स्त्रियांचे संस्कृतिविकासातील हे योगदान आजच्या संदर्भात निश्चितच अभ्यसनीय वाटते.

प्राचीन काळात 'स्त्रीशिक्षण' हे प्रमुख जीवनध्येय नसले तरी ज्ञानप्राप्तीच्या वाटा स्त्रीसाठी बंद मात्र मुळीच नव्हत्या. वैदिक काळपासूनच विदूषी ज्ञानी स्त्रियांचे उल्लेख सर्व आढळतात. गार्गी मैत्रेयी सारख्या विदूषी ह्याचे दाखले आहेत. वेदात अनेक मंत्रद्रष्ट्या स्त्रियांचे उल्लेख आढळतात. वेदकाळातील काही प्रमुख लक्ष्यवेधी स्त्रियांचा अल्पपरिचय ह्या लेखात करून देण्याचा प्रयत्न

ISBN : 978-81-96291-2-6

केला आहे. त्यातून प्राचीन काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान नेमकेपणाने लक्षात येते.

**देवमाता अदिती**

'दिती' म्हणजे मर्यादा किंवा बंधन! जी अमर्याद आहे ती अदिती ! ऋग्वेदाच्या सातव्या मंडलातील दहाव्या सूक्तातील चौथ्या ऋचेत अदितीचा उल्लेख 'विश्वजन्या' असा आला आहे. ती विश्वहितैषिणी आहे. अदिती 'समाजमाता' होती. समाजाला न्याय मिळवून देण्याची क्षमता तिच्या ठिकाणी होती. वेदकालीन स्त्रियांचे स्वतंत्र विकसित व्यक्तिमत्त्व अदितीच्या रूपाने दिसून येते. ती अतिशय बुद्धीमान आहे. वाक्‌रूपिणी अदितीच्या कृपेने संपूर्ण शब्दमय सृष्टीची निर्मिती झाली असे मानले जाते. स्त्रीचे कार्यक्षेत्र कुटुंब असले तरी आपल्या आचरणाने ती कशी सक्षम बनू शकते हे अदिती दर्शविते.

**अपाला**

अपाला ह्या ब्रह्मवादिनीचा उल्लेख ऋग्वेदाच्या आठव्या मंडलात आला आहे. एक बुद्धिमान स्त्री म्हणून वैदिक साहित्यात तिला मानाचे स्थान आहे. अत्रिऋषींची कन्या असलेली अपाला चर्मरोगाने ग्रस्त होती. ब्रह्मवेता कृशाश्वांशी तिचा विवाह तर झाला पण वाढत्या वयासह तिचे श्वेतकुष्ठ ही वाढले. सौन्दर्याची कांती नष्ट झाली म्हणून पतीने तिचा त्याग केला. अपाला पुन्हा पितृगृही परत आली. तिने इन्द्राला प्रसन्न केले आणि रोगमुक्त झाली. समाजात पुन्हा सन्मानाचे स्थान प्राप्त केले.

**घोषा**

ही दीर्घतमस् या ऋषीची नात, काक्षिवानाची कन्या होती. वैदिक संहितेमध्ये वेदप्रचारिका, ब्रह्मचारिणी कन्या म्हणजे घोषा असा अर्थ केला जातो. ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील दोन सूक्ते (३९ व ४०) ही घोषेने रचली आहेत. पहिल्या सूक्तात अश्विनीकुमारांची प्रशंसा आहे, तर दुसऱ्या सूक्तात तिच्या वैयक्तिक इच्छांचा उल्लेख आहे. घोषेने कुमारिकांसाठी अतिशय उचित असे मार्गदर्शन या ऋचांमध्ये केले आहे.

घोषेला कुष्ठरोग झाला पण तिने खचून न जाता सतत वैदिकधर्माचा, यज्ञधर्माचा प्रचार आणि प्रसार केला. आपल्या अस्तित्वाची दखल समाजाला घ्यायला लावली. समाजात मानाचे, आदराचे स्थान प्राप्त केले.

**जुहू**

ऋग्वेदाचा दहाव्या मंडलात जुहूचे सूक्त आले आहे. बृहस्पतीने पत्नी म्हणून तिचा स्वीकार केला होता. बृहस्पती ब्रह्मज्ञानी म्हणून जुहू 'ब्रह्मजाया'

ISBN : 978-81-96291-2-6

बृहादारण्यक उपनिषदाच्या सहाव्या आणि आठव्या ब्राह्मणात विदेहाचा राजा जनक याने आयोजित केलेल्या ब्रह्मसभेच्या वर्णनात तिचा उल्लेख आढळतो. काही महत्त्वाचे प्रश्न विचारून तिने याज्ञवल्क्याला आवाहन दिले. समग्र अस्तित्वाच्या उत्पत्तीबद्दल गार्गीने अने स्तोत्रे रचली. योगयाज्ञवल्क्य या ग्रंथात गार्गी आणि याज्ञवल्क्य ऋषींचा संवाद आहे. मिथिलेचा राजा जनक याच्या दरबारातील नवरत्नांपैकी गार्गी एक होती. प्राचीन काळातील ती एक बुद्धीमान स्त्री होती.

**मैत्रेयी**

ही वैदिक काळातील विदुषी आहे. ती ब्रह्मवादिनी स्त्री होती. मित्र ऋषींची कन्या आणि महर्षि याज्ञवल्क्यांची दुसरी पत्नी होती. बृहदारण्यक उपनिषदात तिने याज्ञवल्क्यासह केलेल्या अनेक अध्यामिक विषयांवरील संवादांचे वर्णन आले आहे. पतीने संन्यास घेतला तेव्हा तिने त्याला ज्ञानाचा भाग मागितला. शेवटी आत्मज्ञान प्राप्त करून आपली सारी संपत्ती आपल्या सपत्नीस देऊन पतीसह ती वनात निघून गेली. विद्वता आणि विनम्रता यांचे प्रतीक म्हणून मैत्रेयीचा आदर्श अनुकरणीय आहे.

**शची (इन्द्राणी)**

इन्द्राणी शची राजा इन्द्राची पत्नी आहे. तिचे दुसरे नाव पौलोमी जसे देखील आहे. ती पुलोम्याची पुत्री होती. ऋग्वेदात इन्द्राणीचे स्थान प्रमुख आहे. ती इन्द्राला शक्ती प्रदान करणारी व अनेक ऋचांची कर्ती आहे. शालीन मर्यादाशील गृहपत्नीचा ती आदर्श आहे. आपल्या कार्यक्षेत्रात इन्द्राणी विजयिनी आणि सर्वस्वामिनी आहे. आपली शक्ती घोषित करताना ऋग्वेदातील मंत्रात ती म्हणजे 'अहं केतुरहं मूर्धा अहमुग्राविवाचिनी'। अर्थात 'मी विजयिनी ध्वजा आहे. मी उंच शिखर आहे. मी अनुल्लंघनीय शासन करणारी आहे'

**शतरूपा**

शतरूपा ह्या विश्वातील पहिली स्त्री मानली जाते. ही स्वायंभुव मनुची पत्नी होती. मनु आणि शतरूपा यांच्यापासून मानवजातीचा आरंभ झाला. शतरूपा ही महान पतिव्रता होती. पतीबरोबर तिने अनेक वर्षे राज्य केले. पण त्यानंतर दोघांना असे वाटू लागेल की आपण आता राज्यत्याग करून मनुष्य जन्माची परम माहिती प्राप्त करून घ्यावी. आपला ज्येष्ठ पुत्र उत्तानपाद ह्याच्यावर राज्याची जबाबदारी सोपवून शतरूपा मनुबरोबर साधना करण्यासाठी नैमिषारण्यात गेली. संपूर्ण विश्वाची राणी असून तिन हजारो वर्षे अत्यंत कठोर तपश्चर्या केली. ह्या निरासक्त तपश्चर्येने भगवंत प्रसन्न झाले भगवान विष्णुने पुत्रप्राप्तीचे वरदान दिले. मनु–शतरूपाची संतती म्हणजे आपण सारे मानव! अशी ही आदर्श आद्य माता शतरूपा !

### विश्ववारा

ही एक वैदिक सूक्तकार होती. अत्री कुळात हिचा जन्म झाला होता. ऋग्वेदातील पाचव्या मंडलातील २८ वे सूक्त हिने रचले आहे. ही अतिशय बुद्धिमान होती. अतिथि सत्काराविषयी तिला विशेष रूची होती म्हणून तिने त्याच मंत्राविषयी चिंतन केले. ऋग्वेदातील पाचव्या मंडलातील दुसऱ्या अनुवाकातील अठ्ठावीसाचे सूक्त विश्ववारेचे आहे. स्त्रीने घरी आलेल्या अतिथीचा सत्कार कसा करावा हे सांगितले तसेच यज्ञात कोणत्या पदार्थाची आहूती दयावी. त्याचे परिणाम काय होतात याचेही अध्ययन विश्ववारेने केले आहे.

वैदिककाळात भारतीय समाजात स्त्रियांची कशी श्रेष्ठ दर्जास पात्र होती ह्याचे वर्णन करताना वानगीदाखल काही सन्माननीय स्त्रियांचा अल्पपरिचय प्रस्तुत लेखात दिला आहे. त्यावरून वेदकाळातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची कल्पना येते. प्राचीनकाळी स्त्रियांचा दर्जा हा पुरूषांच्या बरोबरीचा होता स्त्री म्हणून कोणतीही गौण किंवा हीन दर्जाची वागणूक तिला मिळत नव्हती. स्त्रीसक्षमीकरणाच्या संदर्भातून पाहिल्यास हा काळ अत्यंत सक्षम, समर्थ स्त्रियांचा होता. ह्या स्त्रियांचा परिचय करून घेणे आज काळाची गरज आहे कारण हा आपला उज्ज्वल वारसा आपल्या वर्तमानाला आदर्श रूप प्रदान करतो. प्राचीन काळातील जे जे उत्तम उन्नत, उदात आहे. ते वर्तमानकाळात डोळसपणे प्रवाहित करण्याचे कार्य विचारवंतानी जाणीवपूर्वक केले पाहिजे. तरच वर्तमान आदर्श उज्ज्वल बनेल!

भूतकाळ हा वारसा असतो
वर्तमान हा आरसा असतो
आपल्या मुद्रेवरील ज्याला दिसत नाही,
त्या समाजाची वाटचाल विनाशाकडे असते....
हेच शेवटी खरे!

ISBN : 978-81-96291-2-6

संदर्भ ग्रंथ सूची —


१) ऋग्वेद — ब्रहमवर्चस्, शांतिकुंज हरिद्वार, उत्तरप्रदेश १९९५ तृतीय आवृत्ती

२) प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती — अनंत सदाशिव आल्तेकर, मनोहर प्रकाशन, वाराणसी

३) भारतातील थोर स्त्रिया — शं.वा.दांडेकर, दांडेकर प्रकाशन, पुणे

४) मनु आणि स्त्री — डॉ.म.वा.कुलकर्णी, अ.भा.इतिहास संकलन समिती, नाशिक २००८

५) महाभारत — गीताप्रेस, गोरखपूर

६) रामायण — गीताप्रेस, गोरखपूर

७) वेदकालीन स्त्रिया — डॉ. मधुकर आष्टीकर, सुरेश एजन्सी, पुणे

८) संस्कृत साहित्यातील स्त्री—विविध भूमिकांचे अध्ययन — डॉ. माधुरी निवृत्ती भास्करवार

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO. (CDVII) 407
ISSN : 2278-9308
April, 2023

## INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | बदलत्या काळातील सामाजिक घडामोडींचे निवडकआत्मकथनातून उमटलेले चित्र<br>डॉ. शिवाजी नीलकंठ नागरे, प्रकाश गंगाराम वावणे | 1 |
| 2 | समाज व साहित्य — डॉ. शरद धापोडे | 6 |
| 3 | हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरीतील सामाजिकता — प्रा.पुरुषोत्तम एम. निर्मळ | 9 |
| 4 | साहित्य आणि समाज — प्रा. सारिका पाचराऊत (साळकर) | 13 |
| 5 | प्रा. पुरुषोत्तम नागपुरेयांच्या साहित्यावरमहानुभाव तत्त्वज्ञानाचा प्रभाव<br>सहा.प्रा. दीपक म वानखडे | 16 |
| 6 | साहित्याची सामाजिकता — प्रा. डॉ. एच.डी. आकोटकर | 20 |
| 7 | साहित्यातून समाज दर्शन — प्रा. रविंद्र डाखोरे | 23 |
| 8 | निर्वासित - विस्थापित - वंचित घटकांच्या समस्यांवर भाष्य करणारी भारतीय स्त्री कविता<br>प्रा. डॉ स्वाती दीपक दामोदरे | 26 |
| 9 | भाषा साहित्य व समाजमाध्यमाव्दारे समाजावर होणारे सकारात्मक परिणाम<br>डॉ. संतोष दामोदर पेठे (प्राचार्य) | 37 |
| 10 | माधव कोंडविलकर यांच्या आत्मकथनातील समाजवास्तव<br>प्रा. सुवर्णा किसनराव घोपे, डॉ. शिवाजी नागरे | 41 |
| 11 | 'सुगरणचा खोपा' व 'जोखड' या ग्रामीण कथासंग्रहातील स्त्रीजीवन<br>प्रा.सीमा पांडुरंग चिमणकर, डॉ.श्रीकृष्ण काकडे | 47 |
| 12 | ग्रामीण कविता व समाजवास्तव — प्रा. शशिकांत वि. काळे | 49 |
| 13 | भालचंद्र नेमाडे यांच्या 'देखणी' या कवितासंग्रहातील भाषाविशेष<br>श्री. रुपेश बाळकृष्णराव फुके | 53 |
| 14 | साहित्य आणि समाज — प्रा. डॉ. वैशाली पांडे | 58 |
| 15 | कालिदासांच्या नाटकातील निवडक कला — सौ. प्राजक्ता आनंद बुर्डकर (कुकडकर) | 62 |
| 16 | संस्कृत भाषेला सोशल मिडियाचे वरदान — प्रा. दर्शना सावम | 67 |
| 17 | ग्रामीण साहित्याचे भाषा वैभव — प्रा. डॉ.पंढरी शेंडीफोडे | 73 |
| 18 | बदलत्या काळात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक घडामोडींचे "मनमौन" कवितासंग्रहात उमटलेले चित्र<br>डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 80 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVII) 407
ISSN : 2278-9308
April, 2023

# साहित्य आणि समाज

प्रा. डॉ. वैशाली पांडे
श्रीमती.व.ना.महिला महाविद्यालय, पुसद
9923879743 rujutargodbole@gmail.com

सारांश -

साहित्य ही समाजाची अभिव्यक्ती असते. साहित्यातून व्यक्त झालेल्या जीवनमूल्यांच्या अभिव्यक्तीवरून तिचे श्रेष्ठत्व ठरते. सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने स्त्री-पुरुष सहजीवन हा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेला विषय आहे. समाजात होणारी परिवर्तने विधायक स्वरूपाची असणे महत्त्वाचे आहे. वेदकालीन संस्कृत वाङ्मयामध्ये प्रतिबिंबित झालेल्या समाजव्यवस्थेचे चित्र अभ्यासले, तर ते अतिशय आदर्श स्वरूपाचे दिसून येते. कन्या म्हणून, पत्नी म्हणून, माता म्हणून स्त्रीला समाजात आदराचे स्थान होते. स्त्री म्हणून दुय्यम दर्जाची वागणूक तिला दिली जात नव्हती. शिक्षणाच्या क्षेत्रातही ती पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारचे शिक्षण ग्रहण करीत होती. हे आपले प्राचीन आदर्श निश्चितच अनुकरणीय आहेत.

प्रस्तावना -

शब्दमाध्यमातून साकार होणारी कल्पनाप्रधान कलाकृती म्हणजे साहित्य! साहित्यकृती कल्पनाप्रधान असली तरी तिची पाळेमुळे वास्तवाच्या जमिनीत खोलवर रुजलेली असतात. अनादिकाळापासून साहित्याचा प्रवास समाजाच्या हितासाठी अव्याहतपणे सुरू आहे. साहित्य हे समाजासह आहे आणि माणसाच्या हितासह आहे, म्हणूनच ते साहित्य आहे.

साहित्य ही समाजाची अभिव्यक्ती असते. एखादी साहित्यकृती ही चांगली साहित्यकृती आहे की नाही हे वाङ्मयीन निकषावर ठरविता येईल. परंतु तिचे श्रेष्ठत्व हे साहित्यकृतीतून व्यक्त झालेल्या जीवनमूल्यांच्या अभिव्यक्तिवरून ठरते. मानवी मूल्ये परिपुष्ट करण्याची क्षमता जोपर्यंत साहित्यात आहे, तोपर्यंतच त्या साहित्यकृती जीवंत राहतील.

साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे म्हटले जाते. ह्याच न्यायाने संस्कृत वाङ्मयातून देखील भारतीयसंस्कृती आणि समाजाचे दर्शन घडते. सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने स्त्री-पुरुष सहजीवन हा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेला विषय आहे. त्याआधारेच समाजात परिवर्तने होत आली आहेत, आणि भविष्यातही होत राहतील. 'समाज' हा परिवर्तनशील असल्याने भारतीयसंस्कृती ज्या जीवनमूल्यांवर आधारित आहे, ती मूल्ये देखील परिवर्तनीय असणे अतिशय स्वाभाविक आहे. परंतु ह्या परिवर्तनाची दिशा मात्र विधायक असायला हवी. विघातक नको! हे परिवर्तन मूळ जीवनमूल्यांच्या गाभ्यावर आघात करणारे नसावे. त्यासाठीच आपण इतिहासाचा उज्ज्वल वारसा जपत भविष्याची आदर्श चित्रे रेखाटत असतो. भूतकालातील जे अनुकरणीय आहे, उदात्त आणि उन्नत आहे, त्या सर्वांना भविष्यापर्यंत पोहचविण्याचीच नव्हे तर सुव्यवस्थितपणे त्या मूल्यांची रुजवण करण्याची जबाबदारी समाजातील 'बुद्धिवादी' म्हणविल्या जाणाऱ्या वर्गाची आहे, किंबहुना ते त्यांचे कर्तव्यच ठरते या दृष्टिकोनातून भूतकाळाशी आपली नाळ जुळलेली हवी. त्यातील संदर्भाचे धागेदोरे भविष्याकडे नेऊन आपल्याला अतिशय डोळसपणे मार्गक्रमण करता आले पाहिजे.

संस्कृत-वाङ्मयाच्या काळातील समाजव्यवस्थेचा अभ्यास त्या साहित्याच्या आधारे करून तत्कालीन स्त्रीपुरुष समानतेचे प्रमाण, सहजीवनाचा नेमका आशय, स्त्रियांचे समाजातील स्थान, पत्नी म्हणून, माता म्हणून, कन्या म्हणून

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVII) 407

ISSN : 2278-9308
April, 2023

विविध भूमिका वठविताना तिचा सामाजिक दर्जा कसा होता? अशा विविध घटकांवर चर्चा करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे. त्यातून तत्कालीन समाजव्यवस्थेची कल्पना येते. त्याचबरोबर अनुकरणीय आदर्शांनाही उजाळा मिळतो.

**विषयविवरण -**

वैदिकसंहितेमध्ये 'कन्या' या शब्दाचा वारंवार प्रयोग केला आहे. 'दुहिता' 'गौरी' अशाही शब्दांचा प्रयोग आढळतो. ऋग्वेदात उषेचे चित्रण सुंदर कन्येच्या रूपात केले आहे. नवयुवतीप्रमाणे शुभ्रवस्त्रधारण करणारी उषादेवी संपूर्ण पृथ्वीवरील संपत्तीची अधीश्वरी आहे असे उषेचे सुंदर युवतीच्या रूपात वर्णन केले आहे. या सूक्तावरून असे लक्षात येते की विवाहासाठी कन्येच्या सौन्दर्याला विशेष महत्त्व देण्यात येत होते.

पुत्रजन्माला जन्माला महत्त्व असले तरी या काळात कन्याप्राप्तीचीही इच्छा केली जात असे. गुणवती कन्या व्हावी म्हणून ऋषी प्रार्थना करीत होते. कन्याजन्माच्या अभावी निसर्गचक्राचे संतुलन कायम राहणार नाही याची जाणीव त्या द्रष्टया ऋषींशी होती. म्हणूनच ते समजून-उमजून कन्याजन्मासाठी प्रार्थना करीत होते. कन्येच्या जन्मानंतर तिचे लालन-पालन प्रेमाने करून तिचा विवाह करून दिला जात असे. त्याचबरोबर तिला पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणही दिले जात असे. त्या काळी यज्ञ आणि धार्मिक अनुष्ठानांना अधिक महत्त्व असल्यामुळे शिक्षण म्हणजे 'वैदिक शिक्षण' हीच प्रामुख्याने शिक्षणविषयक संकल्पना होती. त्यांना उपनयनाचा देखील अधिकार होता. उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनास सुरुवात होई. ब्रह्मवादिनी आणि सद्योद्वाहा असे विद्यार्थिनींचे दोन प्रकार होते. ब्रह्मवादिनी ह्या आजन्म ब्रह्मचर्य पाळून वेदविद्येचा व ब्रह्मविद्येचा अभ्यास करीत. पठनाशिवाय स्वतंत्र लेखनही त्या करीत. लोपामुद्रा, विश्ववारा, व घोशा या विदुषींनी रचलेल्या ऋचा ऋग्वेदात आढळतात. ब्रह्मयज्ञाच्या वेळी केल्या जाणा-या तर्पणात सुलभा, मैत्रेयी, गार्गी वाचक्नवी या विदुषी स्त्रियांचीही नावे आढळतात. याज्ञवल्क्यांची पत्नी मैत्रेयी आत्मज्ञानविषयक जिज्ञासेबद्दल प्रसिद्ध होती. विदेहराज जनकाच्या राजसभेत जी आध्यात्मिक चर्चा चालत असे, त्यात गार्गी प्रमुख होती. एका प्रसंगी तिने याज्ञवल्क्याला देखील वादात कुंठित केले होते. ब्रह्मवादिनी पुरुषांप्रमाणेच अध्यापनाचा व्यवसाय करीत असत. त्यांना 'उपाध्याया' किंवा 'आचार्या' अशी संज्ञा होती. आद्य शंकराचार्य आणि मंडनमिश्र यांच्यातील वादासाठी परीक्षक म्हणून खुद्द मंडनमिश्रांची पत्नी 'भारतीदेवींची' एकमताने निवड झाली होती. तिची विद्वत्ता आणि निःपक्षपातीपणा यांना हा मानाचा मुजरा होता. ऋग्वेदात सत्तावीस मंत्रद्रष्ट्या स्त्रियांचा उल्लेख आहे. काव्य, संगीत, नृत्य, अभिनय अशा कलांबरोबरच शस्त्र-अस्त्र कौशल्याचे शिक्षणही स्त्रियांना दिले जात असे. त्या पतीबरोबर युद्धभूमीवर जात असत. खेल राजाची पत्नी विश्पला पतीसह युद्धात सहभागी झाली होती. वृत्रासुराबरोबर त्याची माता दनु युद्धासाठी गेली होती. 'नमुचि' जवळ संपूर्ण स्त्रीसैन्य होते. मुद्गलाची पत्नी इन्द्रसेना हीने शत्रूना सळोकी पळो करून सोडल्याचे उल्लेख वेदांमध्ये आढळतात.

मुलीचा विवाह पित्यासाठी आनंदाचा प्रसंग असे. विद्वान पिता जावयाचा सत्कार करून मुलीच्या मुलाला मुलगा म्हणून स्वीकारतो. पिता आपल्या कन्येला जेव्हा विवाहयोग्य बनवितो तेव्हा मन अत्यंत सुखाचा अनुभव घेते असा उल्लेख ऋग्वेदात आला आहे. मुलीच्या वैवाहिक जीवनात काही अडचणी निर्माण झाल्या तर मुलगी पितृगृही रहात असे. रोगी, जरठकन्या पित्याच्या आश्रयाने रहात असत. मातापिता रोगी कन्येवर उपचार करून तिला रोगमुक्त करून तिचे सौन्दर्य पुन्हा पूर्ववत् होईल याची काळजी घेऊन तिच्यासाठी योग्य वराचे संशोधन करीत असत. कन्येला वेदकाळात आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. काही मोजके अपवाद सोडले तर बालविवाहाची प्रथा या काळात नव्हती.

विवाहयोग्य कन्या निरोगी व ऋतुमती असावी असे मानले जात होते. विवाहास पात्र वधू निरोगी, अव्यंग व निर्दोष असावी अशी अपेक्षा असे. संसर्गजन्यरोगाने पीडित मुलगी विवाहास अयोग्य मानली जात होती. कक्षिवानाची

ISSN : 2278-9308
April, 2023


घोषा नावाची मुलगी रोगाने पीडित झाली होती. तिचा अनेक वर्षे विवाह न झाल्याचे उल्लेख आढळतात. अपालेला कुष्ठरोग झाल्याने पती तिचा स्वीकार करण्यास तयार नव्हता. इन्द्रकृपेने तिचा रोग बरा झाल्यावर पतीने तिचा स्वीकार केल्याची हकीकत आढळते. अशी अनेक उदाहरणे वेदकाळात आढळतात.

वेदकाळात हुंडपद्धतीचा उल्लेख नसला तरी हुंडासदृश भेटी वधूला देण्यात येत असल्याचे दिसते. वधूबरोबर शंभर गायी देण्याचा उल्लेख अथर्ववेदात आढळतो. ऋग्वेदातील 'सूर्याविवाह' सूक्तातही पित्याने मुलीवरील प्रेमामुळे तिच्या पतीच्या घरी गाई पाठविल्याचा उल्लेख आहे. परंतु वैदिककाळात हुंड्यासाठी वधूचा छळ झाल्याचा उल्लेख अपवादानेही आढळत नाही.

विवाहप्रसंगी पत्नी आपला पती सर्व दृष्टीने श्रेष्ठ असावा, अशी इच्छा वैदिककाळात करीत असे. घोषा काक्षिवती अश्विनीकुमारांना विनंती करते की, पत्नीवर प्रेम करणाऱ्या स्वस्थ, बलिष्ठ पतीच्या घरी जाण्याची तिची इच्छा आहे.

पत्नी कुटुंबाची स्वामिनी, साम्राज्ञी आहे असे मानले जाते होते. ऋग्वेदात नवविवाहितेला सम्राज्ञी होण्याचा आशीर्वाद दिला जात होता -

सम्राज्ञी श्वशुरे भव सम्राज्ञी श्वश्र्वा भव।
ननान्दरि सम्राज्ञीभव सम्राज्ञी अधिदेवृषु।।

हे वधू सासऱ्यांची सम्राज्ञी हो, सासूची सम्राज्ञी हो, नणंदेची सम्राज्ञी हो सर्व दिरांची सम्राज्ञी हो.

स्त्री म्हणजे घर व पुरुषाचे आश्रयस्थान असते. वीरसंततीचे प्रजनन करणारी पत्नी प्रशंसनीय मानली जात होती. स्त्रीचे कुटुंबातील कार्य म्हणजे सर्वांचे योग्यप्रकारे पोषण करणे' उषस् सूक्तामध्ये उषेचे वर्णन असे आले आहे, ' उत्तम गृहिणीप्रमाणे सर्वांचे पालन करणारी उषा येते तेव्हा दुर्बलांना शक्तिशाली बनविते. पाय असणाऱ्या जीवांना कर्म करण्यास प्रवृत्त करते व पक्ष्यांना सक्रीय होण्याची प्रेरणा देते त्याप्रमाणे धर्मपत्नी आपल्या पतीला सदैव सहकार्य करते, त्याप्रमाणे उषादेवी व रात्र आमच्या पूर्वीच्या प्रार्थना जाणून आम्हाला प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर करो'

पतीला सदैव सहकार्य करणे हे पत्नीचे आद्य कर्तव्य मानले जात असे.

अगदी प्रारंभीच्या काळापासून स्त्रियांच्या जीवनात तिच्या वैवाहिक जीवनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. पतिनिधनानंतर विधवेचे जीवन कसे होते यावर फारसा प्रकाश पडत नाही. पण जे काही तुटपुंजे उल्लेख आहेत त्यावरून वेदकाळात विधवांचे जीवन फारसे क्लेशयुक्त नव्हते असे दिसून येते. पतिनिधनानंतर स्त्रीने वैराग्यवृत्तीने रहावे असा दृष्टीकोन त्याकाळी मुळीच नव्हता. उलटपक्षी दिराशी विवाह करून किंवा नियोगपद्धतीने संतानोत्पत्ती करून उर्वरित आयुष्य सुखाने घालवावे अशी तत्कालीन समाजाची अपेक्षा होती. ऋग्वेदात नियोगासंबंधी संकेत मिळतात. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार असल्याने त्यांना पुनर्जीवन प्राप्त होत होते. विधवेकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन अत्यंत उदारमतवादी होता.

वैदिककाळात मातेचे स्थान अत्यंत पूज्य व आदरास पात्र होते. ज्यांच्यामध्ये माता-पित्यांचे दर्शन होईल अशा कोणत्या देवतेचे स्मरण करावे असा प्रश्न ऋषींना पडतो. 'अदिती मध्ये त्यांना मातापित्यांचे दर्शन होते. अग्निदेव आपल्याला ह्या मातृस्वरूपा अदितीची प्राप्ती करून देवोत म्हणून ऋषी अग्नीची प्रार्थना करतात. ' हे शतक्रतो, तू आमच्यासाठी पितृतुल्य पालनकर्ता आहेस व मातृतुल्य धारण करणारा आहेस.' असे मंत्रद्रष्टे ऋषी म्हणतात. 'जननी' चा सन्मान आदर वेदकाळात केला जात असे. अथर्ववेदात आलेले वीरप्रसूतीसूक्त, गर्भाधानसूक्त याचेच निदर्शक आहेत. उषस् सूक्तामध्ये ज्याप्रमाणे भरण-पोषण करण्यास योग्य बालके मातेच्या मांडीवर बसतात त्याप्रमाणे देवगण कुशाच्या आसनावर बसोत, हे उषादेवी माता ज्याप्रमाणे पुत्रांचे पोषण करते त्याप्रमाणे तू आमचे पोषण करावे ' अशी उषेला प्रार्थना केली आहे. 'मातेप्रमाणे जलदेवतेने आमचे पोषण करावे' अशी प्रार्थना करताना मंत्रद्रष्टे ऋषी म्हणतात, 'हे

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVII) 407
ISSN : 2278-9308
April, 2023

जलदेवतांनो तुमच्या अत्यंत पोषक रसाचे सेवन आम्हाला करू दे. ज्याप्रमाणे माता बालकाचे पोषण दूध देऊन करते, त्याप्रमाणे तू आमचे पोषण कर' अशी प्रार्थना ऋग्वेदात आली आहे. आपल्या पुत्रासाठी माता प्राणही देण्यास तयार असत. इन्द्रवृत्रयुद्धात इन्द्राद्वारा जखमी झालेल्या वृत्रासुरावर , गाय जशी वासरासह झोपते तशी माता 'दनु' झोपली असा उल्लेख आहे. रात्रीला देवींना 'माता' संबोधले आहे. सिन्धु, सरस्वती, सरयू सारख्या नदयांना वेदांमध्ये 'माता' असे संबोधले आहे.

अथर्ववेदात तर 'पुत्रो माता भवतु संमना:' म्हणजे पुत्र मातेला अनुकूल होवो अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

एकंदरीत वेदकालीन समाजाचा आढावा घेतांना तर स्त्री तिच्या जीवनातील सर्वच भूमिकांमध्ये सक्षम, सरस असल्याचे दिसून येते. 'स्त्री' म्हणून तिला कोणत्याही अवस्थेत निकृष्ट दर्जा दिला गेल्याचे आढळत नाही. शिक्षणाचाही तिला समान अधिकार आहे. वैदिक साहित्यात प्रतिबिम्बित झालेले स्त्री जीवन सर्वार्थाने गौरवपूर्ण आहे.

'स्त्रियांना समान संधी, समानशिक्षण, समानसत्ता, समान प्रतिष्ठा, समान आर्थिक दर्जा प्राप्त झाला तरच सामाजिक समता स्थापन होईल' असे जे मत व्यक्त केले जाते, त्यादृष्टीने वैदिककाळ अतिशय आदर्श म्हणावा लागेल. त्या काळातील काही अनुकरणीय आदर्श प्रस्तुत लेखाच्या माध्यमातून मांडले आहे. त्यातून वेदकालीन समाजाची कल्पना येते आणि आपलाच प्राचीन काळ आदर्श असल्याने प्रगतीच्या नावाखाली परक्यांचे अंधानुकरण करण्याची आवश्यकता नसल्याची जाणीवही होते.

संदर्भ ग्रंथ सूची -

1) ऋग्वेद - ब्रह्मवर्चस्, शांतिकुंज हरिद्वार, उत्तरप्रदेश 1995 तृतीय आवृत्ती
2) प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती - अनंत सदाशिव आलेकर, मनोहर प्रकाशन, वाराणसी
3) भारतातील थोर स्त्रिया - शं.वा.दांडेकर, दांडेकर प्रकाशन, पुणे
4) मनु आणि स्त्री - डॉ.म.वा.कुलकर्णी, अ.भा.इतिहास संकलन समिती, नाशिक 2008
5) महाभारत - गीताप्रेस, गोरखपूर
6) रामायण - गीताप्रेस, गोरखपूर
7) वेदकालीन स्त्रिया - डॉ. मधुकर आष्टीकर, सुरेश एजन्सी, पुणे
8) संस्कृत साहित्यातील स्त्री-विविध भूमिकांचे अध्ययन - डॉ. माधुरी निवृत्ती भास्करवार

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - XI Issue - I November - April - 2022-23

Marathi Part - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.495
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | प्रज्ञाभारती श्रीधर भास्कर वर्णेकर रचित ''श्रमगीता एक अध्ययन''<br>**प्रा. प्रज्ञा व्ही. इंगळे** | ६०-६३ |
| १४ | श्री. गणेश निळकंठ काते विरचित मेघदूतावरील समश्लोकी चे समीक्षण<br>**रोहिणी र. देशमुख**<br>**प्रो. डॉ. नंदा ज. पुरी** | ६४-६७ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर अनुवादित 'ग्रामगीतामृतम्' ग्रन्थातील महिलोन्नती<br>**रोशनी घोडमारे** | ६८-७४ |
| १६ | प्रभाकर भातखंडे यांच्या संस्कृत नाटकांतील आधुनिक आविष्कारांचा चिकित्सक अभ्यास<br>**रूपाली रघुनाथ वाडेकर** | ७५-७८ |
| १७ | संस्कृत-संगीत अनुबन्ध<br>**प्रा. डॉ. ऋजुता गोडबोले** | ७९-८३ |
| १८ | संस्कृत भाषेत बालचित्रपटांची निर्मिती<br>**श्वेता अशोक बडगुजर** | ८४-८९ |
| १९ | प्रज्ञाभारती डॉ. वर्णेकरांची रागांवर आधारित संस्कृत गीते<br>**सोनाली आसरकर शिलेदार** | ९०-९१ |
| २० | कालिदासचरितम् चे नाट्यशास्त्रदृष्ट्या समीक्षण<br>**सौ. सुवर्णा संजयकुमार केवटे**<br>**प्रो. कविता सु. होले** | ९२-१०० |
| २१ | संस्कृत अध्ययनाचे अभिनव ई-माध्यम गीर्वाण वाणी<br>**विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड** | १०१-१०३ |
| २२ | 'सुनन्द बालनाटिका:' ह्या डॉ. सौ. शैलजा रानडे ह्यांनी मराठीतून संस्कृतमध्ये अनुवादित केलेल्या नाटिका संग्रहाचे चिकित्सक अध्ययन<br>**श्री. उल्हास मधुकर रानडे** | १०४-१०९ |
| २३ | संस्कृत-संगीत अनुबंध<br>**प्रा. उत्तरा र. तडवी (प्रधान)** | ११०-११३ |

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com) CC - 24

# १७. संस्कृत-संगीत अनुबन्ध

**प्रा. डॉ. ऋजुता गोडबोले**
श्रीमती. व. ना. महिला महाविद्यालय, पुसद.

बीज शब्द – संस्कृत, संगीत, ऋग्वेद, सामवेद, अनुबन्ध

**प्रस्तावना**

मानवाच्या उत्क्रान्तीचा इतिहास लाखो वर्षांचा आहे. मानवाला प्रगती करण्यासाठी फार मोठी वाटचाल करावी लागली. मानव सभ्यतेसोबतच कलांचा विकास झाला. संस्कृत ही एक सर्वात प्राचीन, समृद्ध, अभिजात आणि शास्त्रीय भाषा मानली जाते. पाणिनीने इ.स.पूर्व काळात संस्कृतभाषेला प्रमाणित केले.

संस्कृत भाषेचा अतिप्राचीन नमुना ऋग्वेदातील मंत्रात आढळतो. हे मंत्र इ.स.पू. 1500 – 1200 ह्या काळात रचले गेले असावेत, असे सर्वसाधारणपणे मानण्यात येते. वैदिक युगाच्या अंतिम कालखंडापर्यंत संगीतविषयक ग्रंथ उपलब्ध नव्हता, परंतु संगीत कलेचे उल्लेख मात्र प्राप्त होतात. भारतीयसंगीत शिव आणि सरस्वती यांना संगीतकलेचे आदिप्रेरक मानते. वैदिक काळात संगीताला समाजात महत्त्वपूर्ण स्थान होते. सर्वात प्राचीन मानल्या गेलेल्या ऋग्वेदात आर्यांच्या मनोरंजनाचे मुख्य साधन संगीत मानले गेले. यजुर्वेदात संगीत अनेकांच्या उपजीविकेचे साधन असल्याचे उल्लेख आढळतात. सामवेद तर गानप्रधान वेद मानला जातो. उत्तरवैदिककाळातही रामायण, महाभारतादिमध्ये गीत–नृत्यादि कलांचे अनेक उल्लेख आढळतात. उपनिषदांमधील तैत्तिरीयोपानिषद, ऐतरेयोपनिषद, छान्दोग्योपनिषद आदिमध्ये संगीताचा परिचय होतो. याज्ञवल्क्यरत्नप्रदीपिका, प्रतिभाष्यप्रदीप, नारदीयशिक्षा, तसेच भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात तर सहा अध्यायांमध्ये संगीतविषयक विवेचन विस्ताराने आले आहे. विदग्धकवींच्या काव्यनाटकादिमधून तर साहित्य, संगीत, कलांचा विपुल प्रमाणात व अत्यंत प्रगत स्वरूपात उल्लेख आढळतो. नाट्यशास्त्राच्या नंतर मतंगमुनींचे बृहद्देशी, संगीतमकरंद, सरस्वतीहृदयालंकार, अभिषालार्थ चिंतामणी, संगीतचूडामणी, संगीतसुधाकर, संगीतरत्नावली, संगीतरत्नाकर, गीतगोविन्द, या सारखे कितीतरी संगीतग्रंथ संस्कृतात आहेत.

मानवाचे जीवन समृद्ध करणारी उत्तम देणगी म्हणजे संगीत! मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबरच संगीताचा विकास झाला. मानवी जीवनाचा संगीत हा अविभाज्य भाग आहे. संगीताद्वारा साध्य होणारे सर्वात श्रेष्ठ प्रयोजन म्हणजे 'अलौकिक आनंदाची प्राप्ती' काव्यप्रकाशकार मम्मटाचार्य वर्णन करतात तसा 'ब्रह्मास्वादसहोदरआनंद' हा काव्यानंद असतो. संगीत माणसाला स्थलकालाचे भान विसरायला लाऊन सुखदुःखांच्या पलिकडे घेऊन जाण्यास समर्थ असते. नीतिशतककार भर्तृहरी म्हणतात, 'साहित्य सङ्गीत कलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः।' इतका साहित्य आणि संगीतादि कलांचा अविभाज्य असा सहसंबंध आहे. प्रस्तुत लेखात वेदकाळापासून असलेल्या संस्कृत–संगीत अनुबंधावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. हा अनुबन्ध अखण्ड, अक्षुण्ण आहे. कारण हा अनुबंधच मुळात सुसंस्कृत, सभ्य जीवनाचा मूळ पाया आहे.

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com) CC - 24

**विषय विवेचन**

वैदिक साहित्याचा अध्ययनावरून प्रकर्षाने हे लक्षात येते की, वैदिक आर्यांनी संगीतकलेचा विकास केला होता. ऋग्वेदादि संहितांमधील मंत्रांचे गायन केले जात असे. प्रत्येक मंत्राचे जसे ऋषी, देवता, छंद असतात तसाच त्याला स्वरही असतो. साममंत्रांचे गायन वैदिक साहित्यात केले जात असे हे सर्वपरिचित आहे. पुरुषसूक्तात म्हटले आहे की, 'तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋच सामानि जज्ञिरे'।[1] अशी सामगीतांची उत्पत्ती परमात्म्यापासून झाली असे सांगितले आहे.

ऋग्वेदात गीत गायनाचा उल्लेख देखील आला आहे. ऋग्वेदाच्या नवव्या मंडलात सोमसूक्तांचे संकलन आहे. सात स्त्रिया सोमरस काढताना गीत गात असत.[2] असा उल्लेख ऋग्वेदात मिळतो. 'साम' नावाची दैवी गीते संगीत शास्त्रानुसार गायिली जात असत. सोमरस काढताना गीते गाणाऱ्यांना 'गाथिन' असे संबोधले जात असे. 'इन्द्रमिद् गाथिनो बृहदिन्द्रमर्केभिरर्किणः।'[3] ऋग्वेदातील सूक्तांमध्ये दिसते किंवा त्यांना 'गाथपति'[4] किंवा गाथानी[5] असेही शब्द वापरले आहेत.

ऋग्वेदात 'ऋजुगाथा' हा शब्द गाणे या अर्थाने वापरला गेला.[6] ऋग्वेदामध्ये दात्यांच्या दानशूरतेची प्रशंसा करणारी दानस्तुती गायिली जात असे. असा उल्लेख मॅकडोनेलने आपल्या संस्कृतलिटरेचर नामक ग्रंथात केला आहे.[7] ऋग्वेदकाळात संगीतकलेचा पुरेसा विकास झाल्याचे अनेक पुरावे आढळतात. गीतांबरोबरच ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलात, सहाव्या मंडलातील सूक्तांमध्ये दुन्दुभी नामक युद्धवाद्याचाही उल्लेख आहे.[8] 'कर्करी' नावाचे बासरी सारखे वाद्य आर्य वाजवीत असत.[9] 'धमन्तो बाणम्'[10] असा ऋग्वेदात एके ठिकाणी उल्लेख आढळतो. बाण ह्याचा अर्थ काही ठिकाणी बासरी तरी काही ठिकाणी वीणा असा मानला जातो. सायणाचार्यांनी ह्याला वीणेचा विशेष प्रकार मानला आहे.

'वेदानां सामवेदोऽस्मि'[11] म्हणून प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण ज्याचा महिमा गातात तो सामवेद म्हणजे तर भारतीय संगीताच्या सप्तसुरांचा उगम आणि पाया आहे. गायनाच्या विविध शैलींचा संग्रह सामवेदात आहे. सामवेदाच्या मुख्य भागाला 'आर्चिक' असे म्हणतात. 'आर्चिक म्हणजे ऋचांनी बनलेली गानयोग्य मंत्रांची संहिता'[12] सामवेदाच्या पाठशाळेत उद्गाता होण्याकरीता प्रथम आर्चिकावरून राग–रागिण्या शिकाव्या लागत असत. आरोह आणि अवरोह यांनी युक्त अशा मंत्रांचे गायन म्हणजे साम होय. 'गांधर्ववेद' हा सामवेदाचा उपवेद मानला जातो. सामवेद हा उपासनेचा वेद आहे. सामगायनासाठी अभ्यास व साधनेची गरज असते. सामगायन करणारी व्यक्ती ब्रह्मपदानजीक पोहोचते. शुद्ध उच्चारणाबरोबर मनातील संगीताच्या अभ्यासाची जोड दिल्यास परमात्म्याच्या सच्चिदानंद स्वरूपाची अनुभूती आल्याशिवाय रहात नाही. यज्ञाची सफलता सामगायनाच्या शुद्ध उच्चाराच्या संगीतमय अभिव्यक्तीवर अवलंबून आहे.[13]

सामगायनाची स्वतःची अशी विशिष्ट स्वरलिपी आहे. ती प्राचीन ऋषिमुनींनी तयार केली आहे. सामवेद गायनात स्वर, लय आणि ताना यांचा विकास आढळतो. ताल मात्र आढळत नाही.

सामवेद हा संगीताचा पाया मानला जातो. जगातील कोणत्याही धर्मग्रंथात गायनाचा इतका समग्र अभ्यास झाल्याचे आढळत नाही. 'सप्त स्वरतु गीतन्ते सामगै बुधै'[14] या ओळींवरून सात स्वरांचा विकास वैदिक कालखंडात झाल्याचे स्पष्ट होते.

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com) CC - 24

भरताच्या नाट्यशास्त्रात नाट्यविवेचनाच्या अनुषंगाने संगीताची अतिशय मौलिक आणि विस्तृत चर्चा प्रामुख्याने अठ्ठावीस ते चौतीसाव्या अध्यायात आली आहे. त्यात संगीताची मूलतत्वे, नाट्यप्रयोगान्तर्गत गायन–वादन तंत्र, सात स्वर, बावीस श्रुती, अठरा स्वरजाती इ. विषय आले आहेत. भरतानंतर संगीतशास्त्रावर मतंग, दंतिल, कोटल इ. नी ग्रंथरचना केल्या.

शारदातनयाचा 'भावप्रकाशन' हा ग्रंथ नाट्यविषयक असून त्यातील एका अध्यायात संगीत विषयक सिद्धान्त साररूपाने दिले आहेत. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात शार्ङ्गदेव नावाच्या काश्मिरी नाट्याचार्याने 'संगीतरत्नाकर' नामक ग्रंथाची निर्मिती केली. ज्यात संगीतशास्त्राची सविस्तर माहिती आली आहे. भरतमुनींच्या पूर्ववर्ती आणि परवर्ती नाट्याचार्यांनी संगीतविषयक ग्रंथरचना केली आहे.

वाल्मीकिरामायणात भेरी, दुन्दुभी, मृदंग, पटह, पणव, डिंडिम, आडंबर, वीणा इ. वाद्यांचा आणि जातिगायनाचा उल्लेख प्राप्त होतो. महाभारतात सात स्वर आणि गांधारग्रामाचा उल्लेख आहे. कालिदासाच्या नाटक काव्यादिमध्ये संगीत, नृत्य इ. चे उल्लेख विपुल प्रमाणात आढळतात. हाच संस्कृत संगीत अनुबंध स्वातंत्र्योत्तर कालखंडातही अक्षुण्णपणे प्रवाहित राहिला.

**श्रीरामसंगीतिका**

प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा.वर्णेकर यांची गीतिकाव्य रचना म्हणून प्रसिद्ध असलेली 'श्रीरामसंगीतिका' स्वातंत्र्योत्तर काळातील संस्कृत–संगीत अनुबन्धाची, किंबहुना तो अनुबन्ध अविच्छिन्नपणे प्रवाहित असल्याची साक्ष देते. श्रीराम–श्रीकृष्ण संगीतिका अशा दोन्ही गीतिकाव्यांमध्ये प्रत्येक गीताच्या सोबत त्यांनी रागनिर्देश केला आहे. ह्या संगीतिकांचा संपूर्ण सरगम कवींनी स्वतः तयार केला आहे.

गीतगोविन्दकार जयदेव गीतिकाव्याचे प्रवर्तक मानले जातात. श्रीराम संगीतिकेचे स्वरूप नृत्यनाट्यात्मक आहे. प्रभुश्रीरामांच्या जीवनातील नाट्यांशांचे गीतात्मक संवादांच्या स्वरूपात चित्रण यात केले आहे.

श्रीरामसंगीतिकेचा आरंभ 'ताटकावधवीथी' ने होतो.

सूत्रधार – 'श्रीरामो जयति जगति पुण्यकृतां त्राता।
रघुवीरो जयति जगति पापकृतां हन्ता।।ध्रु.।।
साधुपरित्राणार्थम्। दुष्टपरिध्वंसार्थम्।
धर्मसमुद्धारार्थम्। प्रतियुगमवतरिता।। 1।। '[5]

असा प्रभु श्रीरामचंद्रांचा जयजयकार करतो. हे स्तवन 'यमन कल्याण' रागात गावयाचे आहे. 'यमन' हा अतिशय लोकप्रिय राग आहे. त्या रागाची उत्पत्ती कल्याण थाटातून होते.

महर्षिविश्वमित्रांचे आगमन, राजा दशरथाने त्यांचे केलेले आदरातिथ्य, कौसल्येने त्यांना अर्पण केलेला मधुपर्क ह्या साऱ्यांचे वर्णन काव्यमय असल्याने रम्य तर आहेच पण त्याला संगीताची जोड मिळाली. बिटान, हमीर, बिलावल, हिंडोल या सारख्या रागांमध्ये हे काव्य गुंफले गेले म्हणून ते अधिक मनोहर, अधिक श्रुतिसुखद बनले आहे.

विश्वमित्रांनी यज्ञरक्षणार्थ रामाची मागणी दशरथाकडे केली. दशरथराजा धर्मकृत्यासाठी म्हणून मान्यता देतो. रामलक्ष्मण हे जणु माझे सव्यापसव्य बाहू, श्वासोच्छवास! कौसल्येचे जणु दोन्ही डोळे, दोन्ही कान, सुमित्रेचा जणु अन्तरात्मा, रामलक्ष्मणाच्या रूपाने विश्वमित्रांबरोबर गेला हे दुर्गा रागातील वर्णन रसिकांना प्रभावित करते.

VOLUME - XI, ISSUE - 1 - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com) CC - 24

सीता स्वयंवरवीथी, वनगमनवीथी, पादुकाप्रदानवीथी, सीतापहरण, सेतुबन्धनवीथी, रावणवधवीथी, सीताशोधनवीथी अयोध्यागमनवीथी इ. शीर्षकांची ही रामायणचरित्र वर्णन करणारी पद्ये निरनिराळ्या रागात बांधलेली आहेत. रामचरित्र युगानुयुगांपासून मानवी मनाला मोहवीत आहे. भारतीयांच्या अपार श्रद्धेचा हा विषय आहे. आर्षमहाकाव्य रामायणापासून रामकथेवर संस्कृतभाषेत विपुल प्रमाणात लेखन झाले. रामायण अनेक काव्यनाटकादिंचे उपजीव्य आहे हे सर्वपरिचित आहे. संगीताचा अनुबंध जोडून संस्कृतवाङ्मयाची रचना रसिकमनोरंजनार्थ करणे हे कवीचे एक वेगळे रचनाकौशल्य आहे. 'काव्यरसिकाना होणरी आनंदप्राप्ती' हे प्रयोजन समोर ठेवून प्रज्ञाभारतींनी प्रस्तुत गीतिकाव्याची रचना केली. सुरांची ओढ, लयीचे आकर्षण ही मानवी मनाची सहजप्रवृत्ती आहे. संगीताची ओढ उपजतच असते.

नवरसाचा आविष्कार साहित्य आणि संगीत दोन्हीमधूनही होतो. काव्य आणि संगीत यांचा मेळ हा निश्चितच 'ब्रह्मास्वादसहोदर' आनंद प्राप्त करून देणारा ठरतो. साहित्य आणि संगीत यांचे ध्येय एकच. रसोत्पत्ती, भावोत्कटतेचा उत्कट आविष्कार व त्यातून आनंद निर्मिती! हेच ध्येय समोर ठेवून प्राचीन काळापासून काव्यनिर्मितीची चालत आलेली परंपरा प्रज्ञाभारतींनी श्रीरामसंगीतिका, श्रीकृष्णसंगीतिका व इतर अनेक गेय काव्यांच्या माध्यमातून जीवंत ठेवली आहे.

**सारांश**

संस्कृत साहित्य आणि संगीतकला यांची निर्मिती वेदकाळापासून एकमेकांच्या बरोबरीने एकमेकाना अधिक रोचक, मनोहारी बनवित, हातात हात घालून झाली. रत्नाला सोन्याचे कोंदण प्राप्त व्हावे, आणि दोघांचेही सौन्दर्य झळाळून उठावे तसे या संस्कृत–संगीत अनुबंधाने प्राचीन काळापासून रसिकांची मने रिझविली. 'तात्काळ श्रेष्ठ आनंदाची प्राप्ती' या मम्मटाचार्योक्त काव्यप्रयोजनाला संस्कृतसंगीत या मणिकांचनयोगाने साध्य केले.

मनोरंजनांच्या सर्व माध्यमांमध्ये 'दृकश्राव्य' माध्यम हे रसिकप्रेक्षकांच्या हृदयाला सर्वाधिक आकर्षित करते हे सर्व विदितच आहे. 'नाट्यं भिन्नरुचेः जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्' असे महाकवि, कविकुलगुरू कालिदासांची स्पष्टोक्ती आहे.

ऋग्वेदकाळापासून संस्कृत–संगीताचा हा अनुबंध अखण्ड आहे आणि तितकाच लोकप्रियही आहे. कविप्रतिभेबरोबरच त्याची निपुणता देखील पणाला लावणारा हा काव्यप्रकार आहे. पण 'लोकाराधनेचे' प्रमुख उद्दिष्ट समोर असणाऱ्या संस्कृतसारस्वतांनी तो लीलया हाताळला आणि रसिकांनी त्याला हृदयापासून दादही दिली.

**संदर्भ**

1. ऋग्वेद – 10/90/9
2. ऋग्वेद – 9/66/8
3. ऋग्वेद – 1/1/5
4. ऋग्वेद – 1/43/4
5. ऋग्वेद – 1/190/1
6. ऋग्वेद – 5/44/5
7. वेदकालीन समाज पृ.328

WWW.VIIRJ.ORG

Home
About Us
Editorial Board
Authors Guidelines
Indexing of Journal
Submit Your Articles
Current Issue
Copyright Form
Special Issue
Archieves:

June 2012
Dec 2012
June 2013
Dec 2013
June 2014
Dec 2014
June 2015
Dec 2015
June 2016
Dec 2016
June 2017
Dec. 2019
March 2020
June 2020
Sept 2020
Dec 2020
March 2021
June 2021
Sept 2021
Dec 2021
March 2022
June 2022
Sept 2022
Dec 2022
March 2023
June 2023

ISSN 2319-4979

*Online & Open Access*

# VIDYABHARATI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

*Peer Reviewed Journal*

A JOURNAL OF

- SCIENCE
- ENGINEERING & TECHNOLOGY
- ARTS & HUMANITIES
- COMMERCE & MANAGEMENT

Call for Papers: Papers are invited for publication of current issue for December to March [Volume 15 Issue 2]

Journals currently accepting papers for Peer and Editorial Reviewed publication

*Vidyabharati International Interdisciplinary Research Journal (Special Issue)* ISSN 2319-4979

# लोकनायकांचे संस्कृतसाहित्याच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान

वैशाली चंद्रशेखर पांडे (गोडबोले)

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद

ता.पुसद जि. यवतमाळ - ४४५२०४

## सारांश

*लोकनायक बापूजी अणे हे एक राजकारणकुशल, विवेक निबंधे, उत्तम वक्ते, कर्मनिष्ठ, ज्ञानाभिरुची संपन्न ज्ञानोपासक, स्वयंप्रज्ञ असे श्रेष्ठकवी होते. श्रीतिलकयशोऽर्णवः महाकाव्या व्यतिरिक्त त्यांनी संस्कृत आणि संस्कृतेतर भाषांमध्ये विपुल प्रमाणात लेखन केले आहे. बापूजी अणे प्रत्येक गुढीपाडव्याच्या दिवशी नवीन संवत्सराचे स्वागत करणाऱ्या संस्कृतकाव्यांची रचना करीत असत. राष्ट्रपतितिलकप्रशस्तिपञ्चकम्, समुद्रमंथनम्, मद्यावतीस्तोत्रमधून त्यांच्या संस्कृतपदरचनाही विलोभनीय आहेत. महाकवींनी ह्या महाकाव्यात मराठी म्हणींचा संस्कृतानुवाद केला आहे, तसेच अनेक मराठी व इंग्रजी शब्द त्यांनी संस्कृतात आणले. अशा अनेक वैशिष्ट्यांचे विवेचन करणे आणि लोकनायकांच्या संस्कृत साहित्याच्या क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे हेच या संशोधनलेखाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.*

**मुख्यबिन्दुः** आधुनिक संस्कृतसाहित्य, लोकनायक अणे, श्रीतिलकयशोऽर्णवः, स्फुटरचना

## प्रस्तावना :-

संस्कृत साहित्याच्या क्षेत्रात संस्कृतमहाकाव्य निर्मितीची परंपरा अतिशय समृद्ध होती. रामायणमहाभारताच्या रचनेने वाल्मीकि, व्यास यांना दिगन्त कीर्ती प्राप्त झाली. ज्यांच्या यशोदुन्दुभीचे पडसाद संस्कृतसारस्वताच्या मंदिरात आजही निनादत आहेत अशा महाकविकालिदासाने भारतीयसंस्कृतीच्या उदात्त, विशाल रंगपटावर आपले वाङ्मय चित्र रेखाटले. ज्यांनी यशोरूपीकाय आजही अजरामर आहे अशा अनेक संस्कृत सारस्वतांची परंपरा आम्हाला लाभली आहे.

साहित्यनिर्मिती मागची पूर्वीची उदात्त प्रयोजने संस्कृतमहाकाव्याच्या ऱ्हासकाळात काहीशी मागे पडू लागली पांडित्य प्रदर्शनाची चढाओढ, साहित्यातून परस्परांना मागे टाकण्याची स्पर्धा , ईर्ष्या, महाकविमाघ, भारवी, कुमारदास, भट्टी इ. च्या साहित्यात दिसते. जगन्नाथपंडितांच्या नंतर संस्कृतकाव्यनिर्मितीत खंड पडला असेही बोलले जाऊ लागले. परंतु संस्कृतकाव्यनिर्मितीची परंपरा निश्चितच 'जगन्नाथपण्डितान्ता' नव्हती. ही परंपरा प्रवाहित ठेवणाऱ्या साहित्याची निर्मिती सातत्याने होत होती. प्राचार्य राम शेवाळकर यांनी आपल्या एका लेखात ह्याचा अतिशय समर्पक असा आढावा घेतला आहे ते लिहितात ''जगन्नाथपंडितानंतर संस्कृतकाव्यरचनेची परंपरा उणावली असली तरी खण्डित झाली नाही. संस्कृतकाव्ये, नाटके, स्फुटलेखन, गद्यग्रंथ ह्यांची चालूशतकातील संख्या अगण्य नसली तरी नगण्यही नाही. महाकाव्यनिर्मितीचे हे प्रयत्न देशीभाषेच्या मानाने संख्या आणि गुणवत्ता दोन्ही दृष्टींनी लक्षणीय आहेत. भगवदाचार्यांचे सत्तावीससर्गांचे भारतपारिजातम्, अखिलानंदशर्मांचे एकवीससर्गांचे दयानंददिग्विजयम् आचार्यमेधाव्रतांचे त्याच नावाचे सत्तावीससर्गांचे महाकाव्य, श्रीअन्नदाचरणठाकुरांचे रामाभ्युदयम्, कवीन्द्रपरमानंदांचे कर्णार्जुनीयम्, पं. नरसिंहाचार्यांचे आचार्यनैषधम्, शीघ्रकविशंकरलालयांचे

सावित्री- चरित सारखी परंपरागत प्राचीनकथाभागावर लिहिलेली महाकाव्ये जशी दृष्टोत्पत्तीस येतात. तशी इंग्रजीराजवटीवर, गौरप्रभुत्वावर भाळून लिहिलेली मोहप्रेरित महाकाव्ये ही आढळतात. ए.आर.राजवर्मायांचे 'आंग्लसाम्राज्यमहाकाव्यम्' 'श्रीधरविद्यालंकारभट्टाचार्ययांचे व्हिक्टोरियाराणीवर केलेले 'विजयिनीकाव्यम्' तसेच दिल्लीमहोत्सव काव्यकुल चंद्रवर्मांचे शोकमहोर्मि यासारखी गौरांगप्रभुभक्तिप्रचुरतेची पूर्वसुरींच्या प्रतिभाविलासाबरोबरच राजनिष्ठेचाही वारसा जपणारी काव्ये दाखविता येतील.

समकालीन महापुरुषांच्या विभूतिमत्त्वाने ही भारून गेलेली काही महाकाव्ये आहेत. डॉ. वे. राघवन्यांचे 'श्रीदीक्षितेन्द्रचरितमहाकाव्य' डॉ. व्यं. म. केंकिणी यांचे शिवकैवल्यचरितम्, रामशास्त्रीशेवाळकरांचे पूर्णानंदचरितम्, पं.क्षमारावह्यांनी आपले तीर्थरूप श्रीशंकरपांडुरंग ह्यांच्या जीवनावर लिहिलेले 'शंकरजीवनाख्यानम्' यासारखी अर्वाचीन संदर्भांचे भान ठेवणारी ही महाकाव्ये निर्माण होणे ही संस्कृत भाषेच्या जीवंत प्रवाहित्वाची खूण मानायला हरकत नाही. कविकण्ठवसिष्ठगणपतिमुनी, अप्पाशास्त्रीराशिवडेकर, वासुदेवानंदसरस्वती, गुलाबरावमहाराज, म. म. कृष्णशास्त्रीघुले, ह्यांच्यापासून तो लोकनायक अणे, श्री.भा.वर्णेकर ह्यांच्यापर्यन्त संस्कृतग्रंथकारांची व प्रतिभासंपन्न कवींची परंपरा विसाव्या शतकातही अक्षुण्ण असल्याचे पाहून कोणत्याही संस्कृताभिमान्याला धन्यता वाटेल. विदर्भात नागपूरचे गंगाधरकवी, दारव्ह्याचे माधवरावढाक, पुसदचे आबासाहेब पळेवार, अचलपुरचे रामशास्त्री शेवाळकर यांच्या सुरवाणीतल्या विदग्धरचना मनाला मोह घालणाऱ्या आहेत." संपूर्ण अर्वाचीन संस्कृतकाव्यपरंपरेचा ओझरता आढावा श्रीरामशेवाळकर यांनी घेतला आहे.1

संस्कृतसाहित्यात महाकाव्य निर्मितीच्या परंपरेला अखंडित ठेवण्याचे मोलाचे कार्य ज्या कविश्रेष्ठांनी केले, त्यात लोकनायक माधव श्रीहरी अणे उपाख्य बापूजी अणे यांचा फार मोठा वाटा आहे.

'श्रीतीलकयशोऽर्णवः' हे लोकमान्य टिळकांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे महाकाव्य बापूजींनी निर्माण केले. हे एकच महाकाव्य त्यांना 'अर्वाचीन संस्कृत महाकवींचा' दर्जा देण्यास समर्थ आहे.

**लोकनायकांचा परिचय :-**

लोकनायक बापूजी अणे ह्यांचा जीवनपट अतिशय भव्योदात्त आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रत्येक पैलू मनाला प्रभावित करतो. 'कुशल राजकारणी' आणि 'अर्वाचीन संस्कृत महाकवी' ह्या दोन पदव्या सार्थ ठरतील असे त्यांचे अलौकिक व्यक्तिमत्व होते. राजकारणाच्या क्षेत्रात त्यांनी 'लोकनायक' ह्या पदवीने सन्मान प्राप्त केला तर साहित्यक्षेत्रात 'पद्मविभूषण' ह्या पदवीने त्यांचा गौरव झाला.

लोकनायक बापूजी अणे ह्यांच्या व्यक्तिमत्वाचे काही ठळक पैलू असे सांगता येतील की, ते राजकारणकुशल, विवेक निष्ठनेते, उत्तम वक्ते, कर्मनिष्ठ, ज्ञानाभिरुची संपन्न ज्ञानोपासक, स्वयंप्रज्ञ असे श्रेष्ठकवी होते. ह्या महाकाव्या व्यतिरिक्त त्यांनी संस्कृत आणि संस्कृतेतर भाषांमध्ये विपुल प्रमाणात लेखन केले आहे.

लोकनायक बापूजी अणे ह्यांचा जन्म २९ ऑगस्ट १८८० मध्ये वणी येथे वेदविद्यासंपन्न कुळात झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण चंद्रपूरला व महाविद्यालयीन शिक्षण नागपूरच्या मॉरिस कॉलेज मध्ये झाले. बी.ए. झाल्या नंतर एल. एल. बी. करण्याची त्यांची इच्छा होती परंतु आर्थिक अडचणींमुळे त्यांनी प्रथम अमरावती येथे काशीबाई हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी केली. १९०७ मध्ये कलकत्ताविद्यापीठातून

वकीलीची परीक्षा उत्तीर्ण करून त्यांनी यवतमाळ येथे वकिली सुरु केली आणि एक यशस्वी वकील म्हणून नावलौकिक प्राप्त केला.

लोकमान्य टिळकांच्या कार्याने प्रभावित होऊन ते लोकमान्यांचे अनुयायी बनले. लोकमान्यांनी स्वराज्यप्राप्तीसाठी ज्या साधनांचा अवलंब केला , ज्या चळवळी चालविल्या, जी आंदोलने केली, त्या सर्वांमध्ये बापूजींनी सक्रिय सहभाग घेतला. निष्ठेने एखादे व्रत चालवावे तशा त्या चळवळी त्यांनी पुढे नेल्या.

श्रीतिलकयशोऽर्णवःमहाकाव्य :-

**महाकाव्याची लक्षणे :-** पूर्वसुरींनी सांगितलेली संस्कृतमहाकाव्याची लक्षणे सर्वविदितच आहेत. अग्निपुराणातील महाकाव्यासंबंधीच्या धारणा आहेत, वामनाच्या काव्यालंकार, दण्डीच्या काव्यादर्शात, विश्वनाथाच्या साहित्यदर्पणात, आनंदवर्धनाच्या ध्वन्यालोकात, वामनाच्या काव्यालंकारसूत्रवृत्तीमध्ये, रुद्रटाच्या काव्यालंकारातइ. अनेक ठिकाणी आलेल्या काव्यलक्षणांचा आढावा घेता असे लक्षात येते की, श्रीतिलकयशोऽर्णवः हे महाकाव्य 'महाकाव्य' या संज्ञेस पात्र ठरते. आधुनिक काळातही संस्कृतभाषेची निर्मितिक्षमता या महाकाव्याने सिद्ध केली आहे. खरोखरच महासागराप्रमाणे हे विशाल महाकाव्य आहे. ह्या महाकाव्यात पंचाऐंशी तरंग व बाराहजार श्लोक आहेत. लोकमान्य टिळकांसारखा धीरोदात्त गुणांनी युक्त, सद्वंशीय नायक ह्या महाकाव्याला लाभला आहे. चरित्रवर्णनाबरोबरच टिळककालीन अनेक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भ महाकाव्यात आले आहेत. टिळकांच्या समकालीन अनेक महापुरुषांचे उल्लेख व त्यांच्या कार्यांचे वर्णन येथे आले आहे. म्हणून ऐतिहासिकदृष्ट्याही हे महाकाव्य महत्वपूर्ण आहे. महाकाव्याच्या लक्षणांचे परिस्थितिसापेक्ष आवश्यकतेअनुसरण बापूजींनी केले आहे.

श्रीतिलकयशोऽर्णवः हे गुणाढ्यचरित्राचे वर्णन आहे. लोकमान्यांचे चित्रण धीरोदात्त नायकाच्या स्वरूपात कवीने केले आहे. नायकाच्या गुणांचा उत्कर्ष त्यांनी वर्णिला आहे. महाकाव्यात नगर, समुद्र, पर्वत, ऋतु, रात्र, दिवस इ. चे वर्णन असावे ह्या संकेताचे ही पालन महाकवींनी केले आहे. महाकाव्यात सह्याद्रीपर्वताचे, कोकणाच्या रम्य निसर्गसौंदर्याने नटलेल्या भूमीचे वर्णन महाकवींनी केले आहे. तसेच त्यांनी चोवीसाव्यात रंगात केलेले सिंहगडाचे वर्णन महाकवीकालिदासाच्या ऋतुसंहाराचे स्मरण व्हावे इतके रम्य आणि मनोहर आहे. श्रीतिलकयशोऽर्णवः ह्या महाकाव्यात महाकवींनी ' वैदर्भी ' रीतीचा अवलंब केला असून , प्रामुख्याने अनुष्टुभ छंदात श्लोकरचना केली आहे. प्रसंग विशेषी इतरही अनेकवृत्तांचा समावेश केला आहे. डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी सर्व काव्यलक्षणांचा आढावा घेऊन महाकाव्याची प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

असाधारणनायक, नायकाचे विविध पैलूंनी युक्त जीवन, अशा जीवनाचे सांगोपांग दर्शन, हे सारे ज्यातून व्यक्त होईल अशी गतकालीन कथोपकथा, त्यांची सावयवसालंकृत अभिव्यक्ती, सुखपूर्णशेवट व या सान्यातून येणारी जीवनाच्या भव्योदात्ततेची प्रतिती2 ह्या महाकाव्याविषयक अपेक्षा श्रीतिलकयशोऽर्णवः महाकाव्याने निश्चितच पूर्ण केल्या आहेत.

काव्यप्रयोजन :-

काव्यंयशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।

सद्यःपरनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे।।3

हे मम्मटाने सांगितलेले काव्यप्रयोजन सर्वविदित आहे. प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी आपल्या अर्वाचीन

'संस्कृत साहित्य' ह्या ग्रंथात आधुनिकसाहित्यिकांची प्रयोजने सांगितली आहेत ती अशी संस्कृत श्रद्धा, लोकजागृती, अन्यभाषीय साहित्याचा परिचय, समाजहित, छात्रहित, स्वाध्याय, धनाशा, परप्रेरणा, संस्कृतचे अखिल भारतीयत्व, नवीनपद्धतीचे प्रवर्तन, प्राचीन लेखकांचे अनुसरण4

**श्रीतिलकयशोऽर्णवः** –महाकाव्य निर्मितीची महाकवींनी यातील प्रमुख प्रयोजने अनुसरली आहेत. मुख्य म्हणजे संस्कृत श्रद्धा आणि संस्कृतभाषेचे अखिल भारतीयत्व ही प्रयोजने ठळकपणे दिसतात. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचे मराठी त्रिखण्डात्मक टिळकचरित्र उपलब्ध असताना ही त्या आधारे महाकवींनी संस्कृत महाकाव्याची रचना केली. लोकमान्यांचे चरित्र समाजाला निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे. 'लोकजागृती' आणि 'समाजहित' तसेच छात्रहित ही प्रयोजने निर्विवादपणे त्यांच्या डोळ्यासमोर होती. आपल्या महाकाव्याच्या तृतीय खंडात तिलकचरित्राचे वर्णन करताना ते म्हणतात

तिलकचरितमेतद्भव्यराष्ट्रस्य मुक्तै
प्रकटविमलमार्गंदर्शयत्येवनित्यम्।
दलितपतितदीनान्स्वाभिमानेन शीघ्रं
नयति भरतपुत्रान्विश्वबन्धुत्वधाम।।5

श्रीतिलकयशोऽर्णवाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, महाकवींनी ह्या महाकाव्यात मराठी म्हणींचा संस्कृतानुवाद केला आहे, तसेच अनेक मराठी व इंग्रजी शब्द त्यांनी संस्कृतात आणले. परिवर्तनशीलता' हा भाषेचा स्वभाव असतो. त्यात अनेक नवीन शब्दांची भर पडते, जुने शब्द मागे पडतात. सुलभीकरणाच्या प्रवृत्तीतून ही प्रक्रिया चालू असते. अशीच प्रवाही भाषा कालौघात टिकून राहते .'जगन्नाथपण्डितान्ता संस्कृतकाव्यपरम्परा' असा प्रवाद निर्माण व्हावा येथपर्यंत संस्कृत भाषेला ओहटी लागलेली असताना हे परिवर्तन अत्यावश्यक वाटते. संस्कृत भाषेत अनेक मराठी, इंग्रजी शब्द ही त्यांनी चपखलपणे वापरले आहेत. हा संस्कृतानुवाद सहजसुंदर, रसिकांच्या मनाला भावणाराआहे . जसे -

'शर्करावाग्दमायान्तिपश्चात्तुराशिर्धूलिका- - -'6

'मजातुकाकशापेनोनुकान्स्वहारर्भाक्- - -'7

'Let the dog bark the caravan goes on'

ह्याइंग्रजीम्हणींचा

' नाकोशान्सारमेयाणां विजहाति पथं गजः।' 8

असा अनुवाद ते करतात.

'कृष्णवर्णप्रकर्षाय कृष्णाङ्गारस्य घर्षणम्।9

'शिक्षेनैकेन वाणेन छिन्नेते द्वौ हि पक्षिणौ ',10

'सेहुर्थेप्यखिना रजीचकनाहावशिष्यते ',11

'प्रक्षेपणं हि मूकानां वराहपुत्रो यथा ' 12

अशा अनेक म्हणींना संस्कृतभाषेचा सुंदर साज त्यांनी चढविला आहे.

लोकमान्यांचे वर्णन करताना अंगरखा या शब्दाचा 'अंगरक्षा' असा अनुवाद त्यांनी केला आहे. धूमकेतुला पुच्छतारा, आई, ताई, माई, बाबा, हे मराठी शब्द जसेच्या तसे वापरले आहेत. बुद्धिबळाच्या पटाला ते बुद्धिक्रीडापट म्हणतात, तर बॉम्ब एक्झामिनेशनसाठी 'स्फोटकपरीक्षणम्' असा शब्दप्रयोग त्यांनी केला आहे. अडकित्त्यासाठी 'हस्तकर्तरी' असा शब्द ते वापरतात. चार हजार श्लोकांच्या ह्या विशाल महाकाव्यात असे अनेक शब्द आढळतात. महाकवींनी केलेले हे नवीन प्रयोग सहज स्वीकार्य वाटतात. आणि संस्कृतभाषा ही केवळ पंडितांपुरती शिल्लक राहिली, अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून तिचे अस्तित्व , या विषयी जेव्हा शंका निर्माण होते, तेव्हा हि भाषा अद्याप ही निर्मितिक्षम असल्याचे अशी महाकाव्ये सिद्ध करतात

**लोकनायकांचे स्फुट संस्कृत लेखन :-**

श्रीतिलकयशोऽर्णवः महाकाव्या व्यतिरिक्त बापूजींनी संस्कृतभाषेत काव्यरचना केली आहे. बापूजी अणे प्रत्येक गुढीपाडव्याच्या दिवशी नवीन संवत्सराचे स्वागत करणाऱ्या संस्कृतकाव्याची रचना करीत असत. प्रत्येक संवत्सराच्या नावाला अनुसरून त्याची वैशिष्ट्ये त्यांनी अतिशय सुंदररीतीने प्रतिपादन केली आहेत. चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६६ रोजी प्रारंभ झालेल्या ' तारण ' संवत्सराच्या शुभेच्छा देताना ते लिहितात -

देवासुरमनुष्यापत्यागारे तारणास्पदम्।
भया दुस्तारणाब्दोऽर्यप्राणिनां भूनिवासिनाम्।।13

'तारण' या शब्दावर अतिशय समर्पक श्लेष साधून हे संवत्सर सर्वांना तारून नेणारे ठरो , अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत. चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६७ रोजी प्रारंभ झालेल्या ' पार्थिव संवत्सराच्या' अभिनंदनपर बापूजींनी संस्कृत काव्य रचले. कोलंबो येथे असताना बापूजींनी ही रचना केली होती. या पद्यात राजा वेन , जो स्वायंभुवमनूच्या वंशातील राजा होता , आणि त्याच्यापासूनच निर्माण झालेला राजा पृथु यांचे उल्लेख आले आहेत. हे पार्थिव जन पृथुची अपत्ये आहेत, त्यांनी या पार्थिव संवत्सराचे स्वागत करावे असे बापूजी म्हणतात.

चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६८ रोजी प्रारंभ झालेल्या व्यय संवत्सराच्या स्वागतपर संस्कृतरचना, चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६९ रोजी प्रारंभ झालेल्या सर्वजित संवत्सराच्या स्वागतपर संस्कृतरचना , चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८७० रोजी आरंभ झालेल्या सर्वधारिन्संवत्सराच्या स्वागतपर संस्कृतरचना, चैत्र शुध्द १८७१ रोजी विरोधी नावाचे संवत्सर सुरु झाले त्यावर संस्कृत काव्यरचना, १८७२ ला प्रारंभ झालेल्या विकृति नामक संवत्सराच्या स्वागतपर रचना, १८७३ च्या ' खर ' संवत्सराचे स्वागत करणारी संस्कृतरचना, १८७५ साली ' विजय ' संवत्सराचे स्वागत करणारी संस्कृतरचना, १८७८ साली दुर्मुख संवत्सराच्या स्वागतपर रचना, अशा अनेक सुंदर रचना बापूजींनी केल्या, त्यातील काही रचना तरुणभारत या दैनिकात प्रसिद्ध झाल्या, तर काही हस्तलिखित स्वरूपात आहेत. कवींचे संस्कृत प्रभुत्व या स्फुटरचनांवरून ही सहजसिध्द होते.

**राष्ट्रगुरुतिलकप्रशस्तिपञ्चकम् :-**

लोकमान्य टिळकांवर बापूजींची नितांत श्रध्दा ह्या काव्यातून दिसून येते. राष्ट्रगुरु असा लोकमान्यांचा सार्थ उल्लेख त्यांनी केला आहे. ह्या काव्याच्या प्रत्येक श्लोकात टिळकांचे वेगळे वैशिष्ट्य त्यांनी प्रतिपादन केले आहे.

राष्ट्रव्याधिहरं भिषग्वरमणिं विद्यावतांशेखरं
ज्येष्ठं नीतिविदां विरक्तचरितश्रेष्ठं समष्टिप्रियम्।
वेदाभ्यासरतं परार्थनिपुणं प्रज्ञास्थितं पण्डितं
बाले राष्ट्रगुरुं नमामि तिलकं तं कर्ममीमांसकम्।।14

या श्लोकात लोकमान्यांच्या व्यक्तिमत्वाचे अतिशय समर्पक वर्णन त्यांनी केले आहे . विस्तारभयास्तव संपूर्ण काव्याचा उल्लेख येथे करीत नाही लोकनायकांच्या स्फुटरचनांमध्ये' विष्णुपदस्तुति ' पद्याचा आवर्जुन उल्लेख करावा असे हे काव्य आहे. 'सत्पुरुषवर्णनम्' हे देखील असेच छोटेसे हस्तलिखित काव्य आहे.

२७ जानेवारी १९२९ ला यवतमाळच्या ज्युबिलीलायब्ररीच्या विहिरीवर कोनशिला बसविली त्यावर कोरण्यासाठी बापूजींनी आपल्या प्रियपत्नीच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशा श्लोकाची रचना केली -

द्विजगुरुजनसेवादेवभक्तिर्जलेऽस्मिन्
अतिथिषुगृह्यातेष्वादरोभर्तृनिष्ठा।
विनयमधुरचर्याचात्मजप्रेमलत्वम्

विकसतु यमुनायाः षड्लं शीलपद्मम्।।15

आपल्या मृतपत्नीची स्मृती त्यांनी अशी जोपासली होती . १९४२ सालच्या भारत छोडो आंदोलनाच्या अत्याचाराची जबाबदारी आर्मी सेक्रेटरी रोटनहॅम याने जाहीर रीतीने गांधीजींच्या माथी मारली, तेव्हा ब्रिटिशसरकारच्या निषेधार्थ गांधीजींनी एकवीस दिवसांचे उपोषण केले होते. बापूजींनी ह्याचा निषेध म्हणून आपल्या व्हाईसरॉय पदाचा त्याग केला, गांधीजींच्या उपवासाबद्दल अनुष्टुभ्छंदात त्यांनी सहाश्लोकांचे संस्कृत पद्य प्रसिध्द केले. ह्या पद्याचा इंग्रजी अनुवाद ही त्यांनी केला.

समुद्रमंथनम्, भद्रावतीस्तोत्रम्ह्या त्यांच्या संस्कृतपद्यरचनाही विलोभनीय आहेत. लोकाग्रणी श्रीबाबासाहेब देशमुख यांना लोकनायकांनी संस्कृत पद्ययुक्त श्रध्दांजली अर्पण केली आहे. हे पद्य करुणरसाचा उत्कृष्ट नमुना आहे. शार्दूलविक्रिडित हे बापूजींना प्रिय असलेले वृत्त त्यांनी येथे वापरले आहे. केवळ पंच श्लोकात्मक काव्यातून समग्र लोकाग्रणी उभे करण्याचे सामर्थ्य बापूजींच्या लेखणीत आहे.

**सारांश :-** बापूजी अणे अतिशय विद्वान, वेदविद्यासंपन्न, क्रियावान्पंडित होते. राजकारणात अत्यंत व्यस्त असून ही त्यांनी संस्कृत भाषेप्रति असलेला जिव्हाळा जपला. त्यांना ' महाकवि ' हा बहुमान प्राप्त करून देणारे श्री तिलकयशोऽर्णवः हे महाकाव्य त्यांच्या चतुरस्त्र प्रतिभेचे साक्षीदार आहे. संस्कृतभाषेत इतरही स्फुटलेखन त्यांनी मोठ्याप्रमाणात केले आहे. पाठीच्या मणक्याच्या दुर्धर आजाराने ग्रस्त असताना, मानसिक सामर्थ्याने शारीरिकव्याधीवर मात केली आणि देववाणीत आपल्या गुरूंचे चरित्र रचले. संस्कृताभ्यसकांना निश्चितच अतिशय मार्गदर्शक ठरावे असे हे महाकाव्य आहे. संस्कृत साहित्य निर्मितीची गंगा अखंडपणे प्रवाहित ठेवण्यात महाकवींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे .

संदर्भ


1) शेवाळकर राम – सारस्वताने झाड अर्वाचीन संस्कृत महाकाव्य
2) डॉ. द. भि. कुलकर्णी – महाकाव्य स्वरूप व समीक्षा पृ. १७
3) मम्मटकृत काव्यप्रकाश, प्रथम उल्लास कारिका– २
4) डॉ. श्री. भा. वर्णेकर – अर्वाचीन संस्कृतसाहित्य पृ . ६, ७
5) अणे मा.श्री.श्रीतिलकयशोऽर्णवः खं– १ त.७१ श्लोक १०१
6) अणेमा.श्री.श्रीतिलकयशोऽर्णवःखं– १त.१श्लोक-२
7) अणे मा.श्री.श्रीतिलकयशोऽर्णवः खं–१ त.८ श्लोक-२८
8) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त.८श्लोक – २९
9) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त. ११,श्लोक–१०४
10) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त.१७, श्लोक-३४
11) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त.२१, श्लोक–३८
12) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –२त.२७, श्लोक–६२
13) अणेमा.श्री. हस्तलिखितपद्यश्लोक-१
14) अणेमा. श्री.राष्ट्रगुरुतिलकप्रशस्तिपञ्चकम्श्लोक– १
15) हरदासवीणाताई,लो. अणेवत्यांचाकाळपृ.४७२

## संदर्भसूची

१) शेवाळकर राम - अर्वाचीन संस्कृत महाकाव्य
२) कुलकर्णीडॉ. द. भि. - महाकाव्यस्वरूपवसमीक्षा
३) वर्णेकर डॉ. श्री. भा. – अर्वाचीन संस्कृत साहित्य
४) अणे माधव श्रीहरी - श्रीतिलकयशोऽर्णवः
५) देशपांडे डॉ. गो. ना. - स्मृतिधन
६) हरदास वीणाताई - ओंजळ
७) केळकर न. चि. – लोकमान्य टिळक यांचे चरित्र

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXXIV) 434-C
ISSN : 2278-9308
November, 2023

# संस्कृत साहित्यातील पर्यावरण विषयक विचार

प्रा.डॉ.वैशाली पांडे (गोडबोले)
श्रीमती व ना महिला महाविद्यालय, पुसद ९९२३८७९७४३

सारांश –

पर्यावरण संरक्षणाची कल्पना मानव जातीच्या इतिहासा इतकीच प्राचीन आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीत पर्यावरण संरक्षणाला अतिशय प्राधान्य होते. हजारो वर्षापूर्वी मानवी जीवनाच्या कल्याणासाठी नगराच्या कोलाहलापासून दूर, निसर्गाच्या सानिध्यात, शांत वातावरणात आपला आश्रम बनऊन निवास केला. पर्यावरण रक्षणासाठी मानवाचा सहयोग अत्यावश्यक आहे. प्राचीन ऋषिमुनींनी वृक्षांना, दगडांना, नद्या, पर्वतांना देव मानले. त्यांचा सामान्य जनमानसांशी नित्याचा संबंध जोडला. प्राचीन भारतीय परंपरेच्या अनुषंगाने निर्माण झालेले संस्कृत वाङ्मय याची साक्ष देते की चराचर सृष्टी ही मानवाच्या दैनंदिनजीवनाचा अविभाज्य भाग होती. त्यामुळे या वाङ्मयाचे अनुशीलन आजच्या काळात करणे अगत्याचे वाटते. पर्यावरण संरक्षणाचे शिक्षण सुरुवातीच्या काळातच मिळणे गरजेचे आहे. पर्यावरणाने प्रदान केलेल्या सुरक्षा कवचात आपण सुखनैव निवास करतो. त्या सुरक्षा कवचाचा छेद आपल्याच अस्तित्वाला घातक ठरणार आहे ही जाण निर्माण होणे अत्यावश्यक वाटते. ती जाण संस्कृतवाङ्मयाने प्रकर्षाने जागृत ठेवल्याचे त्या वाङ्मयाच्या अभ्यासाने लक्षात येते. एतदर्थ वैदिक काळापासून वाङ्मयात पर्यावरणीय जाणीवा कशा जागृत होत्या याचा आढावा येथे घेतला आहे.

प्रस्तावना–

पाश्चात्य देशांच्या औद्योगिकरणाच्या प्रवृत्तीमधून निसर्गावर अपरिहार्यपणे काही दुष्परिणाम घडून आले. परिणामी पृथ्वीचा जैविक, भौगोलिक समतोल बिघडला. त्याचे अत्यंत गंभीर परिणाम मानवी जीवनावर झाले.

मानव आणि पर्यावरण परस्परांश्रयी आहेत. मानव हा जीवसृष्टीतील प्रगत बुद्धिमान प्राणी असल्याने त्याने नेहमीच स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी निसर्गाला वेठीशी धरले आहे. स्वतःचे जीवन सुखी करण्यासाठी माणसाने निसर्गात अवाजवी हस्तक्षेप केला. नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार गैरवापर केल्याने त्याची परिणती पर्यावरणाच्या अवनतीत झाली. नैसर्गिक असंतुलन निर्माण झाल्याने ग्लोबल वार्मिंग, प्रदूषण, कोरोना सारखे भयानक आजार अशा समस्या मानवापुढे उभ्या राहिल्या. पर्यावरण प्रदूषण सर्वात अधिक भयावह आहे. ही आज संपूर्ण विश्वाची समस्या आहे. संस्कृत भाषेत एक म्हण प्रसिद्ध आहे – 'प्रक्षालनाद्धि पङ्कस्य दूरादस्पर्शनं वरम्।' म्हणजे 'पाय चिखलाने भरून धुण्यापेक्षा चिखलाला स्पर्श न करणे कधीही चांगले. याच धर्तीवर असे म्हणता येईल की, पर्यावरणाची समस्या निर्माण होऊन त्यावर उपाययोजना करण्यापेक्षा समस्या निर्माण न होऊ देणे महत्वाचे! इतर काही संस्कृतीत देवाने मानवाच्या उपभोगासाठीच ही पृथ्वी निर्माण केली असे मानले जाते. पण भारतीय संस्कृती मात्र मानवाला निसर्गाचा एक भागच मानते.

संस्कृती आणि पर्यावरण यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. संस्कृती मानवाच्या हृदयात परोपकार, समाजसेवा, सहयोग, सहानुभूती यांचे बीजारोपण करते, तर पर्यावरण मानवाला बाह्यरूपाने सशक्त बनविते. भारतीय संस्कृतीची पर्यावरण संरक्षणात अत्यंत महत्वपूर्ण आणि सकारात्मक भुमिका आहे. मानव आणि निसर्ग यांच्यात अतूट नाते आहे. म्हणूनच शास्त्रात वृक्ष, पर्वत, नद्या, झरे पशुपक्षी, सरोवरे इतकेच नव्हे तर दगडांचीही पूजा केली आहे.

प्राचीनभारतीय संस्कृती आणि तदनुषंगाने निर्माण झालेले वाङ्मय यांचे अवलोकन केले असता प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट अशी की, प्राचीन भारतीय निसर्गानुकूल होते. निसर्गाला देव मानून त्यातील शक्तितत्त्वांची ते पूजा करीत होते. इतकेच नव्हे तर चराचर सृष्टी त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक होती.

परि + आवरण मिळून पर्यावरण शब्द बनला आहे. 'परि' या उपसर्गाचा अर्थ परितः चारही बाजूंना, आवरण अर्थात आच्छादन! 'परितः आवृणोति आच्छादयति तत् पर्यावरणम्' अशी

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO. (CDXXXIV) 434-C
ISSN : 2278-9308
November, 2023

पर्यावरणाची व्याख्या यजुर्वेदात आली आहे. आपल्या चारही बाजूंनी आपल्याला उपकारक असलेले वायू, जल, वन, पर्वत नद्या या सर्वांचे आवरण यांचा समावेश पर्यावरणात होतो.

वैदिक संस्कृत वाङ्मयापासून ते अर्वाचीन संस्कृत साहित्यापर्यंत सर्वच कवींनी आपल्या साहित्यकृतीमध्ये निसर्गवर्णनाला अग्रक्रमाने प्राधान्य दिले आहे. कवीचे निसर्गाशी जेवढे तादात्म्य असते तेवढे सामान्य मनुष्याचे असत नाही. कवीच्या अंगी असलेली नवनवोन्मेषशालिनीप्रतिभा त्याचे निसर्गाशी जणू नाते घडवून आणते. साहित्यकृतींचे निसर्गाशी असलेले तादाम्य मानवाला निसर्गाचे व पर्यायाने स्वत:च्या जीवनाचे संरक्षण करण्यास प्रेरित करते. वेदांबरोबरच उपनिषदे, पुराण वाङ्मय लौकिक संस्कृत वाङ्मयातही नद्या, पर्वत, उपवने, वृक्ष, वेलींचे वर्णन विपुल प्रमाणात आढळते. मानवाने संस्कृत साहित्याचा आणि आयुर्वेदाचा अभ्यास करून पर्यावरणाची अनुपम देण असलेल्या प्राकृतिक वनस्पतींचा लाभ घेऊन स्वत:चे जीवन रोगमुक्त बनविले. हवा, पाणी या सारख्या नैसर्गिक स्रोतांची निर्मिती मानवाला करता येत नाही, हे सर्वविदितच आहे. म्हणून निसर्गदत्त असलेल्या या गोष्टींचा संतुलित वापर करणे अतिशय आवश्यक आहे. साहित्याच्या अनुशीलातून ही जागृती फार मोठ्या प्रमाणात संभव होऊ शकते. एतदर्थ साहित्यकृतीतील पर्यावरणीय संदर्भांचा येथे ओझरता आढावा घेतला आहे.

विषयविवरण —

ऋग्वेदात आकाशाला पिता आणि पृथ्वीला माता असे संबोधले आहे. 'मा हिंसी पुरुषं जगत्' म्हणजे स्वत:च्या स्वार्थासाठी कोणत्याही प्राण्याची हत्या करू नये अशी वेदांची आज्ञा आहे. ऋग्वेदात 'वनानि न: प्रजाहीतानि। म्हणजे वने प्रजाहितासाठी असल्याने त्यांची तोड न करण्याविषयी सांगितले आहे.

'नु वायो: अमृत वि दस्येत्।' या ऋचेत वायूमधील अमृत म्हणजे ऑक्सिजनचे प्रमाण कमी न होऊ देण्याविषयी प्रार्थना आहे.

ऋग्वेदातील एका सुक्तातविविध घटकातील विष म्हणजे प्रदूषण हरण करण्याविषयी प्रार्थना केली आहे:

'आप ओषधीरूत नोऽवन्तुद्यौर्वनागिरयोवृक्षकेशा:।।'

म्हणजेच जल, वनस्पती, नभोमंडल, वन, वृक्ष आणि झाडांनी व्यापलेले पर्वत आमचे रक्षण करोत अशी प्रार्थना ऋग्वेदात आली आहे. पर्यावरणीय तत्त्वांनाच देवता मानून त्यांची प्रार्थना येथे केलेली दिसून येते. तसेच —

'द्यावा क्षामा सिन्धवश्च स्वर्गूता:।
गव्यं यव्यं यन्तो दीर्घाहिषं वरमरूण्यो वरन्त:।।'

आकाश, पृथ्वी प्रवाहयुक्त नद्या, मला दुग्धादि अन्न आणि दीर्घ जीवन प्रदान करोत. ही उषा श्रेष्ठ वस्तू प्रदान करो. ही प्रार्थना ही रनसर्ग तत्त्वांना उद्देशूनच केलेली दिसते.

वेदांमध्ये नद्यांना अत्यंत श्रेष्ठ स्थान दिले आहे. जलस्रोत जीवनदायी असल्याने ऋग्वेदकालीन ऋषी सरस्वतीला 'अम्बितमे नदीतमे देवितमे सरस्वति' असे आदराने संबोधतात.

'सर्वा नद्यो अशिमिदा भवन्तु। सर्व नद्यांचे पाणी आरोग्यदायी होवो' अशी ऋग्वेदात प्रार्थना आली आहे. तसेच 'इयम्मर्ष सरस्वती वा सुभगा ददिर्वसु।।' सुन्दरी सरस्वतीच समृद्धी आणि विपुल धन अर्पण करते असे वर्णन आले आहे.

इदमाप: प्र वहत् यत् किंच दुरितं मयि।
यद्वाहमभिदुद्रोह यद्वा शेपउतानृतम्।।

वैदिक साहित्यात एकतीस नद्यांचा उल्लेख आला आहे. त्यातील पंचवीस नद्यांचा उल्लेख एकट्या ऋग्वेदात आहे.

जलदेवता माझी पापे, वाईटगोष्टी, असत्यभाषण, शाप दूर करी अशी प्रार्थना करून जलाने अमंगलाचा नाश करण्याचे सामर्थ्य प्रदर्शित केले आहे.

यजुर्वेदातही अशा पर्यावरणीय तत्त्वांना ऋषिमुनींनी प्रार्थना केल्याचे दिसते. ते प्रार्थना करतात. 'श्वात्रा पीता भवत यूयमापो।'

अस्माकमन्तरुदरे सुशेवा:।
ता अस्मभ्यमयक्ष्मा अनमीवा

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXXIV) 434-C
ISSN : 2278-9308
November, 2023

अनागस: स्वदन्तु देवीरमृता ऋतायुधा।।

याचा अर्थ असा की आम्ही प्राशन केलेले जल आम्हाला बलदायक ठरावे. ते आमच्या पोटात सुखद व्हावे. त्यामुळे रोग न होवोत. ते आरोग्यवर्धक, निष्पाप, सत्याची स्थापना करणारे, अमृत आणि स्वादिष्ट असो. निसर्गाशी मानवाचे असलेले तादम्य या वर्णनातून प्रकर्षाने जाणवते —

'सुमित्रया न आप ओषधय: सन्तु।।'

जल आणि वनस्पती आम्हाला प्रिय होवोत. अशी सदिच्छा व्यक्त केली आहे.

पञ्चनद्य: सरस्वतीमपि यान्ति सस्रोतस:।

सरस्वती तु पञ्चधाऽसौ देशेऽभवत् सरित्।।

यजुर्वेदात म्हटले आहे की, पाच नद्या वहात येऊन सरस्वतीला मिळतात. सरस्वती शाखा प्रशाखांसह राष्ट्रामध्ये ज्ञानाचा विस्तार करो. नैसर्गिकतत्वे आपल्या कल्याणकारित्वासाठी आहेत ही भावना वेदकालीनांच्या मनात रुजलेली होती.

अथर्ववेदात ऋषी म्हणतोकी, 'माता भूमि: पुत्रोऽहं पृथिव्या:' पृथ्वीला त्याने मातृत्व बहाल केले आहे. तिचे पालन पोषण हे त्याचे आद्य कर्तव्य हे ओघाने आलेच! पृथ्वीचे रक्षण हे पुत्रकर्तव्य मानून होत होते.

'सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे।'

ती भूमी आम्हाला उत्तमराष्ट्र, शक्ती, प्रभा प्रदान करो अशी कामना केली आहे.

अथर्ववेदाच्या द्वादशकांडात 'भूमिवर्णन' आले आहे. त्याचे अवलोकन केले तर वेदकालीन पर्यावरण विषयक जागृतीची स्पष्ट कल्पना येते. ऋषी भूमीची प्रार्थना करताना म्हणतात की, सागर—सरिताचे विपुल जल, शेतीचे उत्पन्न झालेले उत्कृष्ट धान्य तसेच सजीव प्राणी यांनी समृद्ध असणारी ही भूमिदेवी आम्हास विपुल अन्न प्रदान करो.'

चारही दिशांना विस्तारलेली, तसेच नानाविध प्राण्यांना धारण करणारी ही भूमिदेवी आमच्या धेन्वादि पशूंना विपुल अन्न प्रदान करो. हे पृथ्वीदेवी, तुझ्या ठायीचे हिमयुक्त पर्वत आणि अरण्ये आम्हास सुखदायक होवोत. पोषक, कृषियुक्त, वृक्षसंपन्न, अनेकरूपधारिणी आणि स्थिर अशा सुरक्षित पृथ्वीवर आम्हास अपमृत्युरहित जीवन प्राप्त होवो.

अथर्ववेदात 'अप्स्वन्तरमृतमाप्सु भेषजम्' म्हणजे जलामध्ये अमृत आहे. जलामध्ये औषध आहे असे म्हटले आहे.

शतपथ ब्राह्मणात देखील 'अमृतं वै आप:' असे म्हणून पाण्याला अमृत ठरविले आहे. त्यामुळे जलप्रदूषण करणे महापाप समजले जात असे.

ईशावास्योपनिषदाच्या आरंभी आलेला —

ॐ पूर्णमिद: पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।

हा शांतिपाठ अतिशय अर्थगर्भ आहे. सच्चिदानंदस्वरूप परब्रह्म सर्व प्रकारे पूर्ण आहे आणि हे दृश्य जगत् सुद्धा पूर्णच आहे. जरी पूर्ण परब्रह्मातून हे पूर्णजगत् व्यक्त स्थितीत आलेले असले तरीही या पूर्णब्रह्म्याच्या पूर्ण स्थितीला बाधा येत नाही. ते आहे तसेच पूर्ण राहते. याच उपनिषदाच्या पहिल्या मंत्रात असे कथन केले आहे की,

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।

तेन त्यक्तेन भुञ्जीथा: मा गृध: कस्यस्विद् धनम्।।

याचा आशय असा आहे की, या जगात जे काही उत्पन्न होणारे व विलयास जाणारे आहे, ते सर्व ईशतत्वाचा निवास असलेले आहे. त्या ईशतत्वाच्या साक्षीने त्यागबुद्धी ठेवून भोग्य वस्तूंचा उपभोग घे. ही सृष्टीपरंपरा कोणा एकाच्या मालकीची नाही. म्हणून गिधाडासारखे काहीही हव्यासाने घेऊ नकोस हा उपदेश अनंत हातांनी सृष्टिसंपदेचा उपभोग घेणाऱ्या सर्व मानवांना अंतर्मुख करणारा आहे.

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति।

सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते।।

याचा आशय असा की, जो आपल्यासारखे, सर्व प्राणिमात्रांना आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये आपल्याला पाहतो तो कोणाचाही तिरस्कार करीत नाही. पर्यावरण जोपासनेचा मूलमंत्र असावा असा

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXXIV) 434-C
ISSN : 2278-9308
November, 2023

हा मत आहे. सर्व चराचर सृष्टीशी ज्याचे जीवन तादात्म्य पावते, त्यांच्याशी जो एकरूप होतो, असा सुसंस्कृत व्यक्ती स्वतःच्या अस्तित्वाबरोबरच चराचरसृष्टीचे अस्तित्वही सोबत घेऊन जगत असतो.

पुराणांनी पूर्तधर्म म्हणजे तलाव, विहिरी, धर्मशाळा, अन्नछत्रे इ. निर्माण करून परोपकार करणे पुण्यकारक असल्याचे सांगितले आहे. वृक्षापूर्तीदाची चर्चा पुराणे करतात. ब्रह्मांडरचना आणि भूगोल हा पुराणांचा एक महत्त्वाचा विषय आहे.

पद्मपुराणात 'दशपुत्रसमोद्रुम:।' म्हणजे एकझाड दहा अपत्याप्रमाणे मानावे असे सांगितले आहे. तर स्कन्दपुराणात म्हटले आहे की,

अश्वत्थमेकं पिचुमन्दमेकं न्यग्रोधमेकं दशचिंचिणीकम्।
कपित्थबिल्वामलकत्रयं च पञ्चाम्रवापी नरकं न पश्यते।।

याचा अर्थ असा की, वड, पिंपळ, कडुलिंब, चिंच, बेल, आंबा, कवठ, अशोक ही झाडे लावून त्यांचे संगोपन करणाऱ्याला नरकयातना होत नाहीत. वृक्षारोपण व संगोपनाने फळ सांगून मानवाला त्यासाठी प्रवृत्त केले आहे. वरील सर्व वृक्ष मोठे, सावली देणारे, फळे देणारे वृक्ष आहेत हे विशेष।

वामनपुराणात असा श्लोक आला आहे की,
"पृथ्वी सगन्धा सरसास्तथाप: स्पर्शीच वायुर्ज्वलितंच तेज:।
नभ: सशब्द महता सहैव कुर्वन्तु सर्वे ममसुप्रभातम्।।" (१४.२६)

सुप्रभातच पर्यावरणाच्या सर्व तत्त्वांना स्मरून होत होती असे दिसते. त्यामुळे पर्यावरण चिंतन हा वेगळ्याने चिंतनाचा विषय नसून दैनंदिन जीवनाचा तो अविभाज्य भाग असल्याचे लक्षात येते. भविष्यपुराणात सृष्टीची उत्पत्ती, ब्रम्हांडाचे वर्णन, गृहस्थधर्म, सूर्योपासना, यज्ञमहिमा, यज्ञप्रक्रिया इत्यादी बरोबरच वृक्षमाहात्म्य वर्णिले आहे. भविष्य पुराणाच्या द्वितीय मध्यम पर्वात वृक्षमहिमा प्रामुख्याने वर्णिला आहे. या पर्वाच्या दहाव्या अध्यायात सांगितले आहे की झाडे लावण्यास मुळनक्षत्र प्रशस्त मानले आहे. कोणती झाडे कोठे लावावीत व लावू नयेत. याचाही विवेक भविष्यपुराणात दिसून येतो. दाट सावलीची झाडे, पुष्प फळांची झाडे चौरस्त्यावर, मार्गावर लावणाऱ्याचे पितृगण पापातून मुक्त होतात. वृक्षारोपण केल्याने मनुष्याचे पूर्व आणि पर पितर पापमुक्त होऊन स्वर्गात जातात म्हणून वृक्षारोपण करावे असे भविष्यपुराण सांगते. वृक्ष पुत्रहीनाला पुत्र देतात. मुक्ती प्राप्त करण्यासाठी हजारो, लाखो, करोडो, शक्य तेवढे वृक्ष लावावेत असे येथे सांगितले आहे. तसेच निरनिराळे वृक्ष लावल्याने कोणत्या फलाची प्राप्ती होते. याविषयी भविष्य पुराण सांगते. पिंपळाचा वृक्ष लावल्याने धन प्राप्ती होते. अशोकाने शोकनाश, प्लक्षवृक्षाने, यज्ञत्वप्राप्ती, बेलाने आयुष्यप्राप्ती, जांभळाने धनप्राप्ती, तेंदूवृक्षाने कुलवृद्धी, डाळींबाने कामिनीची प्राप्ती, बकुळ आणि अशोकाने पापमुक्त, बल आणि बुद्धीची प्राप्ती होते. आवळ्यामुळे स्वर्गप्राप्ती, वडामुळे मोक्षप्राप्ती, आम्रामुळे इच्छापूर्ती, सुपारीने सिद्धी, कदम्बापासून विपुल कीर्ती, जिवन्ती ने रोगनाश, केशराने शत्रुनाश, श्वेतवटाने धनप्राप्ती, शिंशपा, अर्जुन, जयंती, कनेर, श्रीवृक्ष, किंशुक लावल्याने ब्रह्मत्वाची प्राप्ती आणि हजार वृक्ष लावण्यास विष्णुपदाची प्राप्ती होते असेही भविष्यपुराण सांगते.

वृक्षारोपणाचा नुसता महिमा सांगून भविष्यपुराण थांबत नाही तर वृक्षाचा नाश करणाऱ्यांना कशी वाईट फळे मिळतात ते ही कथन केले आहे. पिंपळ, वट, श्रीवृक्ष लेशमात्र जरी कापले तरी मनुष्य ब्रह्मघाती ठरतो. वृक्ष मुळासकट तोडले तर कुळाचा नाश होतो. वृक्षाचा छेद करणारा मुका होतो. त्याला शेकडो शारीरिक, मानसिक कष्ट होतात. इतकी विलक्षण पर्यावरण विषयक जागरूकता भविष्यपुराणात आढळते.[¹]

माणूस आणि निसर्ग यांच्यातील परस्परसंवाद 'रामायण' या आदिकाव्यात दिसून येतो. आदिकवीच्या तोंडून बाहेर पडलेला, रामायणाच्या रचनेचे मूळ असलेला श्लोकच त्यांचे पर्यावरणविषयक प्रेम प्रकट करतो. व्याधाच्या बाणाने विद्ध झालेल्या क्रौञ्चमिथुनापैकी एकाला प्राणांतिक वेदनेने तळमळताना पाहून आणि क्रौञ्चीचा करुण आक्रोश ऐकून महर्षींचा शोक श्लोकरूपात प्रकट होतो.

रामायणकाळात घनदाट अरण्ये होती. जसे चित्रकूट, नैमिषारण्य, दंडकारण्य, पंचवटी. रामाचे अधिकाधिक जीवन वनवासात गेले. युद्धकांडात हनुमताने संजीवनी नामक वनस्पती आणल्याचे

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXXIV) 434-C
ISSN : 2278-9308
November, 2023

सर्वविदितच आहे. ऋषिमुनी शांतपणे ज्या ठिकाणी तपश्चर्या करून ब्रह्मचिंतन करीत अशी अरण्ये जेव्हा दानवांचे निवासस्थान बनली तेव्हा रामाने दंडकारण्यात प्रवेश केला राक्षसांचे पारिपत्य केले आणि ऋषिमुनींना शांत निसर्गाचा सहवास पुन्हा प्राप्त झाला.

रामायणाचे किष्किन्धा कांड निसर्गवर्णनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रस्रवण पर्वत आणि त्यांच्या आसपासच्या रमणीय वातावरणाचे वर्णन करून श्रीराम लक्ष्मणाला म्हणतात,

'अस्यां वस्याम सौमित्रेवर्षरात्रमरिंदम।'

रामायणात अग्नितत्वाची देखील देवता मानून पूजा केली जात असल्याचे निदर्शनास येते. भगवान श्रीराम सुग्रीवाशी अग्निसाक्षीने मैत्री करतात. नित्य आणि गृह्य नामक अग्नीचे वर्णन रामायणात आले आहे.

रामायणात तमसा, गंगा, सरयू, मंदाकिनी, गोदावरी, नर्मदा, तुंगभद्रा, कावेरी इ. नद्यांमध्ये वर्णन तसेच अशोकवाटिका, अयोध्येतील उपवने, मिथिलेतील उपवने, पंपा सरोवरा जवळील उद्यान, लंकेतील उपवन, मधुवन इ. उद्यानांची वर्णने वाचनीय आहेत त्यातून रामायणातील पर्यावरण विषयक जाण प्रकर्षाने जाणवते.

महाभारताच्या आदिपर्वात 'आपोमया सर्वरसाः सर्वमापोमयं जगत्।।' म्हणजे सर्व रस जलापासून बनले आहेत. वस्तुतः सर्व जग जलमय आहे. अशी जलतत्वाची महती वर्णन केली आहे.

शांतिपर्वात, असा श्लोक आला आहे की,

वल्ली वेष्टयते वृक्षं सर्वतश्चैव गच्छति।

न ह्यदृष्टश्चैव मार्गोऽस्ति तस्माद् पश्यन्ति पादपाः।। १७७.१७

वृक्षांनाही दृष्टी आहे. वेल वृक्षाला वेढून सगळीकडे जाते मार्ग अदृष्टी नसतो अशा अर्थाचे हे वचन आहे. आश्वमेधिक पर्वात असे वर्णन आहे की –

पुष्पिताः फलवन्तश्च तर्पयन्तीह मानवान्।

वृक्षदं पुत्रवद् वृक्षास्तारयन्ति परत्र च।।

याचा आशय असा की, या जगात फुले आणि फळे देणारी झाडे लोकांना तृप्त करतात आणि वृक्षदान देणाऱ्यांना पुत्राप्रमाणे वृक्ष वैतरणी पार नेतात.

महाभारताच्या अनुशासन पर्वात जलाशयाच्या तटप्रदेशाजवळ वृक्ष लावण्यास सांगितले आहे –

तस्मात्तडागे वृक्षा वै रोप्याः श्रेयोऽर्थिना सदा।

पुत्रवद् परिपाल्यश्च पुत्रास्ते धर्मतः स्मृताः।।

म्हणजेच ज्यांना पारलौकिक कल्याणाची इच्छा आहे, त्यांनी जलाशयाच्या तटप्रदेशात नेहमी वृक्ष लावावे. त्या वृक्षांचे पुत्राप्रमाणे पोषण करावे ते धर्मतः पुत्र मानले जातात. अनुशासनपर्वातच वनामध्ये अज्ञानवश सुद्धा आग लावणारा ब्रह्मघाती मानला आहे.

लौकिक संस्कृत साहित्य तर पर्यावरणीय संदर्भांनी ओतप्रोत आहे. महाकाव्यात ऋतुवर्णन, निसर्गवर्णन असावेत हा तर महाकाव्यवर्णनाचा मानदंडच आहे. महाकवि कालिदासाची नाटके, महाकाव्ये, निसर्गवर्णनाचे सर्वांगसुंदर नमुने आहेत. त्याची शकुन्तला साक्षात निसर्गकन्या आहे. वृक्षांना पाणी दिल्याशिवाय जी कधी स्वतः पाणीही पीत नाही. त्याचे मेघदूत तर ठायीठायी निसर्ग वर्णनाचे रमणीय रेखचित्रण! विस्तार भयास्तव या सर्वांचा सविस्तर उल्लेख येथे केला नाही.

'वसुधैव कुटुम्बकम्' ही भावना हृदयाशी कवटाळून वाटचाल करणारी, 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' अशी उदात्त प्रार्थना करणारी भारतीय संस्कृती निसर्गाला आपलाच एक भाग मानते. झाडे लावणे, पाणवठे तयार करणे, प्रदूषण न करणे यांनाही यज्ञ मानले आहे. 'तेन त्यक्तेन भुञ्जीथा' या उक्तीप्रमाणे मानवाने निसर्गाला न ओरबाडता त्याचे रक्षण करीत सुख उपभोगले पाहिजे ही आपल्या ऋषींची अपेक्षा आहे.

संदर्भ ग्रंथ सूची –

१) आर्ष सुभाषित साहस्री – रामजी उपाध्याय चौखम्बा सुरभारती प्रकाशन वाराणसी
२) वेदकालीन समाज – शिवदत्त गुप्ता चौखम्बा सुरभारती प्रकाशन वाराणसी

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXXIV) 434-C
ISSN : 2278-9308
November, 2023

३) भविष्यमहापुराणम् (द्वितीय खंड) — पं. बाबुराम उपाध्याय (अनुवादक) (हिन्दी साहित्य संमेलन प्रयाग)
४) संस्कृत वाङ्मय मे पर्यावरण चेतना — प्रो. उमारानी त्रिपाठी, कला प्रकाशन बी.एच.यू. वाराणसी
५) वेदों मे पर्यावरण संरक्षण —anantajournal.com
६) वेदों पर्यावरण चिंतन, चिंता, चेतावनी —https://hindiindiawaterportal.org.
७) वेदों में पर्यावरण संतुलन का महत्त्व —https://hindiindiawaterportal.org.
८) भारतीय दर्शन मे पर्यावरण विमर्श —https://www.sicallahabad.org
९) वेदकाल —https://vihwakosh.marathi.gov.in
१०) रामायणातील निसर्ग आणि माणूस —https://writatopic.com article
११) रामायण में प्रकृति पर्यावरण विचार — डॉ.मणिभूषण मिश्र अभिषेक प्रकाशन दिल्ली
१२) महाकवि कालिदासांच्या साहित्यातील पर्यावरण संरक्षण —https://oldhistoricity.lipword
१३) यजुर्वेद वाङ्मय में पर्यावरण का स्वरूप —www.divyayug.com
१४) वेदातील पर्यावरण—https://www.mahamtb.com
१५) पुराणो में पर्यावरण संरक्षण —https://www.jefir.org.

ISSN 2454-1974

# THE RUBRICS

## Journal of Interdisciplinary Studies

*International, Peer Reviewed, Indexed*

www.therubrics.in

**One Day Multidisciplinary International Conference On**

## Global Perspectives in Higher Education: Issues, Challenges and Remedies

9th March 2024

GPIHE

Volume 6 Issue 2

*Conference Proceeding: Special Issue Editors*

**Dr. Manoj Bhagat, Dr. Pravin Chandak**
**Dr. Sau. Aparna Patil, Dr. Sunil Chakave**
**Dr. Deepak Kute**

*Organized by*

Bapuraoji Butle Arts, Narayanrao Bhat Commerce and
Bapusaheb Patil Science College, Digras, Dist. Yavatmal
Mungasaji Maharaj Mahavidyalaya Darwha, Dist. Yavatmal
Arts and Commerce College, Bori Arab, Dist. Yavatmal

*Published by*

Magnus Publishing & Distributors

THE RUBRICS JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES
International, Indexed and Peer Reviewed e-Journal
ISSN 2454-1974

# श्रीमद भगवद्गीतेतील संतुलित आहाराची संकल्पना

डॉ. वैशाली पांडे (गोडबोले)

**प्रस्तावना -**

संतुलित आहार ही निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे. अन्न ही मानवी जीवनाचे अस्तित्व टिकविण्यासाठी प्राथमिक गरज आहे. शरीराची वाढ होणे, झीज भरून काढणे, कार्यशक्ती निर्माण करणे या गोष्टी अन्नामुळे घडून येतात. त्यामुळे आहारात घेतलेले अन्न पोषणदृष्ट्या संतुलित असले पाहिजे. शरीराचे पोषण व संवर्धन यासाठी प्रथिने, पाणी, जीवनसत्व व खनिजद्रव्ये, ह्यांचा योग्य प्रमाणात पुरवठा आपल्या आहारातून व्हायला हवा. कोणत्याही एकाच खाद्यपदार्थात् हे सर्व घटक योग्य प्रमाणात मिळणे शक्य नसल्याने या सर्व घटकांचे सुयोग्य प्रमाण देणाऱ्या आहारात विविध पदार्थांचा समावेश करून साधता येते. अशा संमिश्र आहाराला संतुलित आहार म्हणता येईल. आहारात पोषणमूल्यांची कमतरता असेल तर त्याचा परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. आहार आणि आजार यांचा जवळचा संबंध आहे. बरेचसे आजार, व्याधी, विकृती यांचे मूळ कारण अयोग्य आहार हेच असते. संतुलित आहाराने मनुष्याची ऊर्जा वाढते. शरीराची कार्यपद्धती सुधारते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

आज झपाट्याने बदलणाऱ्या खाद्यविषयक सवयींकडे पाहिले तर प्रकर्षाने असे जाणवते की, आजच्या नंव पिढीच्या विश्वात संतुलित आहार या संकल्पनेकडे संपूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण पिझ्झा, बर्गर अशा पदार्थांना फार मोठ्या प्रमाणात प्राधान्य देत आहेत. व्यस्त दिनचर्या, जिभेचे चोचले पुरविण्याची हौस, आळशीपणा किंवा अन्य काही कारणांनी आता 'उदरभरण' हे 'यज्ञकर्म' राहिले नाही हे कटू असले तरी वास्तव आहे. चुकीचे अन्नग्रहण करण्याच्या सवयींचे परिणामही दृष्टोत्पत्तीस येत आहेत. प्रमाणाबाहेर वाढणारा मेद, हृदयावर होणारा घातक परिणाम याशिवाय कितीतरी अन्य आजारांचा प्रादुर्भाव यातून होतो. शारीरिक आणि मानसिक दौर्बल्य प्राप्त झालेली पिढी निर्माण होत आहे. हा पाश्चात्य संस्कृतीच्या अंधानुकरणाचा दुष्परिणाम आहे. भारतीय संस्कृती पुरातन काळापासून संतुलित आहाराचे अनन्य साधारण महत्त्व प्रतिपादन करीत आलेली आहे. 'तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलासी' अशी आज माणसाची अवस्था झाली आहे.

मानवाचे आयुष्य समृद्ध होण्याची शिकवण देणारा एक अमूल्य ग्रंथ म्हणजे श्रीमद्भगवद्गीता! जगातील सर्वोत्कृष्ट आध्यात्मिक ग्रंथांपैकी एक मानली जाणारी गीता ही माणसाच्या आयुष्याला सत्य आणि सदाचाराचा मार्ग दाखविते. कठीण परिस्थितीतही जीवनाला धैर्याने सामोरे जाण्यासाठीचा समतोल गीता शिकविते. गीता सांस्कृतिक आणि धार्मिक सीमांच्या पलीकडे जाणारे कालातीत ज्ञान देते. हजारो वर्षे लोटली तरी गीताज्ञानाची महती, उत्सुकता, महत्त्व कमी होताना दिसत नाही. कलियुगातही गीता तितकीच महत्त्वाची असल्याचे दिसून येते. सुखी आणि आनंदी जीवनासाठी गीतेतील काही उपदेश अत्यंत उपयुक्त आहेत. अशा उपयुक्त उपदेशांमध्ये आहारविषयक उपदेशाचाही समावेश आहे. आहार किती प्रकारचा असतो ? कोणता आहार सेवन करणे योग्य याचा उहापोह गीतेमध्ये केला आहे, त्याचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्याचा प्रयत्न केला आहे. सद्यस्थितीत अत्यंत उपयुक्त असे मार्गदर्शन त्यातून निश्चितच प्राप्त होईल.

विषय विवेचन:-

श्रीमद्भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायातील सतराव्या

श्लोकात - युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ।।

असा उल्लेख आला आहे. त्याचा अर्थ असा आहे की, जो व्यक्ती योग्य आहार आणि विहार करणारा आहे. यथायोग्य कर्म करणारा आहे. परिमित शयन आणि जागरण करणारा आहे, अशा योग्याचा योग त्याच्या सर्व दुःखाचा नाश करतो.

'युक्त आहार विहारस्य' चा नेमका अर्थ असा आहे की, माणूस जे भोजन ग्रहण करतो ते सत्याने, न्यायाने प्राप्त केलेल्या धनाने मिळवलेले असावे. सात्विक असावे. ते स्वादबुद्धीने नाही तर शरीर धारणेसाठी केले पाहिजे. 'सर्वम् अत्यन्तं गर्हितम्' अर्थात कोणत्याही गोष्टीचा अतिरेक नको या न्यायाने भोजन ग्रहण करावे असे गीता सांगते.

THE RUBRICS JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES
International, Indexed and Peer Reviewed e-Journal
ISSN 2454-1974

सहाव्या अध्यायातच सोळाव्या श्लोकातही भगवंत अर्जुनाला सूचित करतात की,

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमश्नतः।
न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन।।

अर्थात प्रमाणापेक्षा अधिक खाणाऱ्याला, अजिबातच न खाणाऱ्याला अधिक निद्रा घेणाऱ्याला किंवा सतत जागणाऱ्याला योग प्राप्त होत नाही 'युक्ताहार' महत्वाचा आहे. 'अन्नाद्भवन्ति भूतानि' हे गीतेचेच वचन आहे. अन्नापासून प्राणिमात्रांची उत्पत्ती होते. अन्नापासून शरीराचे सप्त धातू रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, आणि शुक्र यांची निर्मिती होते.

निष्काम कर्मयोगाची प्रेरणा देणारी, मानवी जीवनाची सर्वोत्तम आचारसंहिता असलेली श्रीमद्भगवद्गीता ही मानवाच्या दीर्घ, स्वस्थ, उन्नत जीवनाची सर्वोत्कृष्ट आहारसंहिता देखील आहे. निसर्गनियमानुसार चारही वर्णांचे अन्न निरनिराळे असते. गीतेच्या सतराव्या अध्यायात त्याचे सुस्पष्ट स्वरूपात वर्णन आले आहे. गीतेत भगवंत अतिशय स्पष्टपणे सांगतात की, आहार शुद्ध असेल तरच अंत:करण शुद्ध असते. शुद्ध अंत:करणातच ईश्वराची स्मृती सहजपणे राहते, अशी स्मृती दृढ झाल्याने अविद्येमुळे निर्माण झालेल्या गाठी सुटतात. सतराव्या अध्यायात सातव्या श्लोकात म्हटले आहे -

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रिय: ।

जे भोजन आपण ग्रहण करतो ते त्रिविध म्हणजे तीन प्रकारचे असते. मनुष्य तीन गुणांनी युक्त असतो, कुणी सात्विक, कुणी राजस तर कुणी तामस प्रकृतीचा असतो. जो सात्विक म्हणजेच सत्वगुणाने युक्त असतो त्याला प्रिय असणाऱ्या आहाराचे वर्णन असे आले आहे -

आयु: सत्वबलारोग्य सुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: स्निग्धा: स्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया: ।। (१७.८)

आयु म्हणजे जीवनमान वाढविणारा आहार. आपण जे खातो त्यावर आपले जीवनमान अवलंबून असते. सत्व म्हणजे सत्त्व वाढविणारा, अर्थात आपली सहनशक्ती, प्रतिकारशक्ती वाढविणारा, बल म्हणजे ताकद वाढविणारा, आरोग्य वाढविणारा, सुख वाढविणारा, प्रीती म्हणजेच आनंदात वृध्दी करणारा सात्त्विक आहार असतो असा आहार सात्विक व्यक्तिला प्रिय असतो असा आहार रसयुक्त असतो म्हणजेच कोरडा नसतो, त्यात स्निग्धाचा अंश असतो. 'स्थिर' म्हणजे पोटाला आधार देणारा असावा, ज्या आहाराने शरीराला थकवा न येता ताकद मिळेल आणि 'हृद्य' म्हणजे हृदयाला चांगला वाटणारा. रसयुक्त याचा अर्थ भोजनात कटू, आम्ल, तिक्त, कषाय, लवण, मधुर या सहा रसांचे योग्य संतुलन भोजनामध्ये असावे. केवळ गोड खाणे, नुसतेच तिखट खाणे अयोग्य आहे, भोजन षड्रस युक्त असावे आजच्या काळात आपण ज्याला 'बॅलन्सड डाएट' संबोधतो ते मुळात गीतेत सांगितले आहे.

रजोगुणी व्यक्तीला प्रिय असणाऱ्या आहाराचे वर्णन गीतेत असे आले आहे.

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिन: ।
आहार: राजसस्येष्टा दु:खशोकामयप्रदा:।। (१७.९).

कटू म्हणजे तिखट, असे आहारशास्त्र सांगते आणि तिक्त म्हणजे कडू! आम्ल म्हणजे आंबट, लवण याचा अर्थ खारट, अतिउष्ण, म्हणजे फार गरम पदार्थ राजसी वृत्तीच्या मनुष्याला आवडतात. तीक्ष्ण म्हणजे मसालेदार पदार्थ, 'रुक्ष' म्हणजे कोरडे भोजन, ज्यात स्निग्धांश मुळीच नसतो. 'विदाहिन' म्हणजे खाल्ल्यानंतर पोटामध्ये दाह निर्माण करणारे भोजन जे खाल्याने ॲसिडिटी वाढेल असे भोजन. रजोगुणी व्यक्तिला प्रिय असते. आधुनिक काळातल्या आहाराच्या सवयी, फास्टफूड चे आकर्षण रजोगुणी व्यक्तीच्या आवडीनिवडीशी जुळणारे आहळते, म्हणजेच हा 'राजस आहार' होय. अशा आहाराने 'आमय' म्हणजे रोग निर्माण होतात. दु:ख आणि शोकाची प्राप्ती होते. आजारांच्या परिणामस्वरूप दु:ख आणि शोकाची प्राप्ती होणे अपरिहार्यच आहे.

तामस म्हणजे तमोगुणी व्यक्तीला प्रिय असणाऱ्या भोजनाचे वर्णन गीतेमध्ये असे केले आहे.

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ।।

THE RUBRICS JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES
International, Indexed and Peer Reviewed e-Journal
ISSN 2454-1974

'यातयाम' म्हणजे जे अन्न तयार होऊन एक प्रहर उलटून गेला आहे. अर्थात शिळे अन्न, गतरसं म्हणजे ज्याचा रस निघून गेला आहे, जे अन्न शुष्क बनले आहे. 'पूति' म्हणजे दुर्गंधीयुक्त, पर्युषित म्हणजे शिळे अन्न, उच्छिष्ट अर्थात उष्टे अन्न, मेध्य याचा अर्थ असा होतो की. मेध म्हणजे यज्ञ, यज्ञात जे चालत नाही असे म्हणजे कोणत्याही प्राण्याचे मांस अमेध्य होय हे ज्याला आवडते तो तमोगुणी असतो. हा तामसी आहार आहे.

भगवान श्रीकृष्णाने गीतेमध्ये चार प्रकारच्या भोजनाविषयी सांगितले आहे. जे भोजन चावणे, चोखणे, पिणे आणि चाटणे या चार क्रियांच्या माध्यमातून केले जाते. असा आहार ग्रहण केला असता तो सहजपणे पचतो आणि प्राणवायू व अपानवायूला संतुलित ठेवतो. ज्ञानेश्वरीत सात्विक आहाराचे वर्णन ज्ञानेश्वरांनी असे केले आहे-

आंगे सानें परिणामें थोरु। जैसें गुरुमुखीचे अक्षरु।
तैसी अल्पी जिहीं अपारु। तृप्ति राहे ॥ (१७ / १२९)

ज्याप्रमाणे गुरूने केलेल्या उपदेशाचे शब्द शिष्यास थोडेच असतात. परंतु ते परिणाम मोठा करून दाखवितात त्याप्रमाणे जो आहार दिसायला अगदी थोडा असतो परंतु सेवनाने पूर्ण तृप्ती देतो तो सात्विक आहार होय.

राजस अन्नाचे वर्णन करताना ते म्हणतात-

आधीच द्रव्ये चुरमुरी। वरी परवळिजती मोहरी।
जिये घेता होतो धुवारी। नाकतोंडे ॥ (१७.१४७)

पदार्थ मूळचेच झणझणीत असून शिवाय मोहरी लाऊन त्याचे अनेक प्रकार केले जातात. ते असे की जे सेवन केले असता नाकातोंडातून वाफा बाहेर पडतात.

तामस अन्नाविषयी माऊली म्हणतात-
निरवले अन्न तैसे। दुपाहरी का येरे दिवसे।
अतिकरे ते तामसे। येईजे ते ॥ (१७.१५५)

त्याप्रमाणे सकाळी शिजवलेले अन्न दोन प्रहरी, अथवा तो दिवस गेल्यानंतर दुसरे दिवशी तमोगुणी खातो.

आहाराचा परिणाम केवळ शरीराला नाही तर मनावरही पडतो. मनुष्याचे व्यक्तिमत्त्व त्याच्या आहारावरून ठरते. भोजनाचे महत्त्व प्रतिपादन करण्यासाठीच जणु महाभारताच्या युद्धापूर्वी शांतिदूत बनून हस्तिनापुराला गेलेल्या श्रीकृष्णाने दुर्योधनाच्या राजसी भोजनाचा त्याग करून विदुराच्या सात्विक कण्या भक्षण केल्या होत्या. एकाग्रचित्ताने परमेश्वराला स्मरून केलेले भोजन प्रसादाप्रमाणे पवित्र बनते. श्रीमद् भागवद्गीतेत आहाराच्या पावित्र्याला अतिशय महत्त्व दिले आहे. शरीरासोबतच मनाचीही उन्नती भोजनाने व्हावी. छान्दोग्योपनिषदात म्हटले आहे -

'आहारशुध्दौ सत्वशुद्धि:' आपण जो आहार सेवन करतो तो शुद्ध असावा, त्यामुळे अंत:करणाची शुध्दी होते. अंत:करण शुद्ध झाल्याने सद्विवेक निर्माण होतो, त्यामुळे मनुष्य सदाचारी बनतो. त्याचे शरीर आणि मन स्वस्थ राहते. त्यामुळे स्वाभाविकच जीवनात सुख शांतीचा लाभ होतो. पर्यायाने स्वस्थ समाजासाठी शुद्ध अन्नाचे सेवन करणे गरजेचे आहे. गीतेनुसार ज्या मनुष्याला शरीराबरोबरच आपले मन, विचार, भावना, आणि संकल्प देखील शुद्ध, पवित्र आणि निर्मल बनविण्याची इच्छा आहे त्याने तामसिक आणि राजसिक आहाराचा त्याग करून सात्विक आहार ग्रहण करावा. 'आहाराचा विवेक' ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे, आजार दाराबाहेर ठेवायचे असतील तर घरचा शुद्ध सात्विक आहार नवीन पिढीला जाणीवपूर्वक दिला गेला पाहिजे. भोजनामुळे शरीरात् आश्चर्यकारक अशी मनोवैज्ञानिक परिवर्तने होतात म्हणून ज्ञानी लोकांनी विचार न करता भोजन करण्याचा निषेध केला आहे.

शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य त्रिगुणांवर आधारलेले असते, अधिक आहार घेतल्याने रजोगुण आणि तमोगुणात वृध्दी होते. परिणामी कामेच्छा वाढते. आळशीपणा, झोप, इ. मध्ये वृध्दी होते. अल्पाहार जडता निर्माण करतो, मानसिक चपलता मंदावते, बुध्दीची निर्णयक्षमता हळूहळू कमी होते. अहंकार वाढीला लागतो, सहनशक्ती कमी होते, मेदवृध्दी मुळे शरीर अनेक रोगांचे माहेरघर बनते. ही अनर्थपरंपरा वेळीच रोखण्यासाठी गीतेने सांगितलेल्या आहारविषयक मार्गदर्शनाचे अनुशीलन करणे आज अत्यावश्यक आहे. सात्विक, सुपाच्य संतुलित आहाराचे सेवन भविष्यातील अनेक समस्यांचा नाश करू शकते. शिवाय सक्षम, समर्थ, सुविचारी अशी भावी पिढी ह्या

THE RUBRICS JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES
International, Indexed and Peer Reviewed e-Journal
ISSN 2454-1974

संतुलित, मिताहारातून निर्माण होऊन भारताचे भवितव्य उज्ज्वल बनेल यात शंका नाही. त्याकरिता आपल्याला अनमोल प्राचीन ग्रंथांना उजाळा देणे, त्यांचे अवगाहन करणे अगत्याचे ठरते.

संदर्भग्रंथ सूची

१) श्रीमद् भगवद् गीता - गीता प्रेस गोरखपूर - २७३००५.

2) सार्थ श्री ज्ञानेश्वरी- संपादक- विद्यावाचस्पती अरुण शंकर वाढेकर प्रकाशक शारदा साहित्य, पुणे.

3) उदरभरण नोहे - डॉ. संध्या जोशी, वेदमुद्रा प्रकाशन, अमरावती

4) आहारविज्ञान - डॉ. कुन्दा सिंह, पंचशील प्रकाशन, जयपूर

5) पोषण आणि आहारशास्त्र - डॉ. मीना काळेले, पिंपळापुरे अँण्ड पब्लीशर्स, नागपूर